13 TO 19 OCTOBER 2025 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 10/11/2025 8:38 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : ४० सोमवार दि. १३ ऑक्टोबर २०२५ ते रविवार दि. १९ ऑक्टोबर २०२५ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## अनैतिक संबंधात अडथला ठरला नातेवाईक महिलेने काटा काढला

अमरावती : क्राईम रिपोर्टर

आपल्या नात्यातील एखादी महिला चुकीच्या माणसाशी अनैतिक संबंध ठेवून आहे असे जेंव्हा एखद्याला समजते तेंव्हा तो तिला समजावण्याचा प्रयत्न करतो. मात्र आपल्याला समजावणारा हा माणूस आपल्या संबंधात अडथला ठरतोय असा जेंव्हा तिचा समज होतो तेंव्हा ती त्याला मार्गातून हटवायला मागेपुढे पाहत नाही अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे येथे एका महिलेचे परपुरुषाशी अनैतिक संबंध होते.मात्र हे तिच्या नात्यातील एका तरुणाला आवडले नाही म्हणून त्याने तिला समजावण्याचा प्रयत्न केला. ...पान ६ वर

# भारताच्या सरन्यायधिशांवर 'बुट' फेरणारे मनुवादी कोपलेत बाबासाहेबांच्या नावावर नेतेगिरी करणारे दलित मात्र झोपलेत





मुंबई : सोनू जाधव

भारतात लोकशाही आहे. त्यामुळे हा देश संविधानावर चालतो. मात्र हे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या एका दलित व्यक्तीने तयार केलेले आहे आणि त्यात सर्वांना समान अधिकार दिलेले आहेत. परिणामी उच्चवर्णीयांच्या मनमानीला लगाम घालण्यात आलाय. त्यांचे वर्चस्व आणि समाजात असलेला धाक कमी झालाय आणि हेच काही लोकांना मान्य नाही. त्यामुळे हे लोक जाणून बुजून संविधानाचा अपमान करीत आहेत. आणि देशात २014 साली मोदींची सत्ता आल्यापासून हिंदुत्वाच्या प्रतिगामी विचारणा एक प्रकारे बळ मिळाले. त्यामुळे संविधान बदलण्याच्या मागण्या होऊ लागल्या. बाबासाहेबांच्या विचारणा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष विरोध होऊ लागला. डॉ. बाबासाहेबांनी दलित ओबीसींना घटनेत शिक्षण आणि रोजगारासाठी जे आरक्षण दिले होते ते उच्चवर्णीयांच्या नजरेत सलू लागले. त्यामुळे शासनातील दलित मागासवर्गीय अधिकाऱ्यांशी उच्चवर्णीय राज्यकर्ते फटकून वागू लागले. दलितांच्या हाताखाली काम करणे काही उच्चवर्णीयांना अपमानास्पद वाटू लागले. अशावेळी एक दलित व्यक्ती देशाचा सरन्यायाधीश होताच त्यांचा जळफळाट होऊ लागला आणि याच पोटदुखीतून सर्वोच्च न्यायालयात राकेश किशोर नावाच्या उच्चवर्णीय वकिलाने सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बूट फेकण्याचा प्रयत्न केला. तसेच मी संविधान मानीत नाही असे म्हणू लागला. खरे तर या घटनेनंतर डॉ. बाबासाहेबांवर प्रेम करणाऱ्या सर्वांनी रस्त्यावर उतरून राकेश किशोर सारख्या मनुवाद्याला बडवायला हवे होते. डॉ.बाबासाहेबांच्या नावाने दुकानदारी करणारे दलित नेते आणि सत्तेतील मंत्री, संत्री यांनी राकेश किशोर विरुद्ध कठोर भूमिका घेवून त्याच्या अटकेसाठी रस्त्यावर उतरायला हवे होते. पण मंत्रिपदाच्या तुकड्यासाठी मोदींचे तळवे चाटणारे नेते डॉ.बाबासाहेबांचे उपकार विसरून गप्प बसले. त्यामुळेच आत मनुवादी पुन्हा आक्रमक होऊन दलितांच्या बोकांडी बसण्याचा धोका निर्माण झाला आहे. म्हणूनच संविधान आणि बाबासाहेबांना मानणाऱ्यांनो आता तरी पेटून उठा आणि राकेश किशोर सारख्या मनुवाद्यांच्या विरोधात उभे रहा, तरच वाचाल असे समाज ओरडून सांगतोय.

सुप्रीम कोर्टाचे चीफ जस्टिस बी.आर.गवई यांच्यावर बूट फेकण्याचा प्रयत्न करणाऱ्या वकिलाने नवीन खुलासा केला आहे. ७२ वर्षांच्या राकेश किशोर यांना आपल्या कृत्याबद्दल कुठलाही पश्चाताप नाहीय. पण त्यांच्या कुटुंबाने मात्र, त्यांच्या कृत्याचा निषेध केलाय. पोलिसांनी चौकशीनंतर राकेशला सोडून दिलं. वॉर्निंग देऊन सोडा असे सरन्यायाधिशंकडूनच अधिकाऱ्यांना निर्देश होते. राकेशने मिडियाशी बोलताना सांगितलं की, तो तुरुंगात जायला तयार आहे. त्याने विशेष जोर देऊन सांगितलं की, तो कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंधित नाहीय मी तुरुंगात असतो, तर जास्त चांगलं झालं असतं. माझं कुटुंब माझ्या कृत्यामुळे माझ्यावर नाराज आहे. ते मला समजू शकत नाहीत असं राकेश किशोर यांनी मयूर विहार येथील त्यांच्या घरातून बोलताना सांगितलं. राकेश किशोर यांनी अनेक तर्कसंगत नसलेले दावे केले. कुठल्या तरी दैवी शक्तीचे मार्गदर्शन मला मिळत ...पान ६ वर

# एका चंचल तरुणीचे होते चार यार तिघांनी मिळून केले चौथ्याला ठार









जळगाव : ललित खरे

आजकाल प्रेमाच्या नावाखाली केवळ अय्याशी चालते. कोण कुणावरही निस्सीम प्रेम करीत नाही. कारण प्रेमाची व्याख्याच बदलून गेली आहे. आजकालची मुले–मुली कपडे बदलतात तसे प्रियकर प्रेयसी बदलत असतात. प्रेमात ब्रेकअप पॅचअप हा त्यांच्या जीवनाचाच भाग झालेला असतो. पण यातून काही भयंकर घटनाही घडू शकतात. जळगाव जिल्ह्याच्या दहीगाव येथील एका तरुणीने ज्ञानेश्वर नावाच्या तरुणाशी प्रेम केले. लग्नाच्या आणाभाका झाल्या. त्याच्या सोबत काही दिवस राहिली आणि तो नोकरीसाठी पुण्याला जाताच दुसऱ्या तिघांना तिने पटवले. त्यातील प्रत्येकाला ती आपल्यावरच प्रेम करतेय असे वाटत होती, पण ती मात्र इम्रान नावाच्या तरुणाशीच जास्त चिकटून होती. इतर दोघांना झुलवत होती. ज्ञानेश्वरला हि गोष्ट समजताच तो भयंकर चिडला आणि त्याने तिच्यावर नाराज असलेल्या इतर दोघा प्रेमवीरांच्या मदतीने इम्रानचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.







जळगाव जिल्ह्याच्या यावल तालुक्यातील दहीगाव हे एक लहानसे गाव. जगाचा नकाशावर नजरेच्या टप्प्यातही येणार नाही असे हे दहीगाव नावाचे एक लहानसे गाव. या गावात ज्ञानेश्वर गजानन पाटील नावाचा अवघा एकोनीस वर्षाचा टीन एजर तरुण रहात होता. या टीन एजर तरुणाला अर्थातच व्यवस्थित मिसरुढ देखील फुटलेली नव्हती. नावातच ज्ञान असलेल्या ज्ञानेश्वरला मोबाईल हाताळण्याचे अगाध ज्ञान होते. इंस्टाग्राम या सोशल मिडीयावर तो सक्रीय अर्थात अॅ क्टिव्ह रहात होता. मजुरी करणारा ज्ञानेश्वर पदरमोड करुन त्याच्यामोबाईल नेट पॅकचा रिचार्ज न चुकता वेळेवर करत होता. मित्रांचे स्टेटस, मेसेजेस ...पान २ वर

## तृतीयपंथीवर जडले होते पतीचे प्रेम पत्नीने अडथळा आणताच केला गेम



कोल्हापूर : क्राईम रिपोर्टर

आपल्या पतीचे बाहेर दुसऱ्या महिलेशी अनैतिक संबंध आहेत हे कुठल्याही पत्नीला सहन होऊ शकत नाही. आणि त्यावरून घरात सतत वाद होतात. संसार तुटतो तर कधी कधी अशा घटनांमधून एखाद्याचा जीवही जातो. एखाद्या विवाहित पुरुषाचे दुसऱ्या महिलेशी अनैतिक संबंध असू शकतात. पण कोल्हापुरातील भादोले गावात एका पुरुषाचे चक्क तृतीयपंथीशी अनैतिक संबंध होते. यावरून पती पत्नीत रोज भांडणे व्हायची याच भांडणाला कंटाळून पतीने पत्नीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातून धक्कादायक घटना समोर आलीये. नवऱ्याचे तृतीयपंथीसोबत अनैतिक संबंध असल्यामुळे बायकोने त्याला जाब विचारण्यास सुरुवात केली. सतत वाद सुरु असतानाच नवऱ्याने बायकोची कोयता आणि ...पान ६ वर

# शुल्लक वाद त्याच्या प्राणावर बेतला रिक्षा चालकाने प्रवाशाचा जीव घेतला




















लातूर : क्राईम रिपोर्टर

राग येतो आणि रागाच्या भरात त्याच्या हातून काही घडू शकते. लातूरच्या रेणापूरमध्ये एका रिक्षाला मागून आलेल्या रिक्षाने धडक दिली. त्यामुळे पुढच्या रिक्षातील प्रवाशांचा मागून धडक देणाऱ्या रिक्षावाल्याबरोबर वाद झाला आणि याच वादातून मागून धडक देणाऱ्या रिक्षावाल्याने त्याच्या साथीदाराच्या मदतीने पुढच्या रिक्षातील वाद घालणाऱ्या प्रवाशाला चाकूने भोसकून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

लातूर शहरातील नवीन रेनापुर नाका परिसरातून २९ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री १:३० वाजण्याच्या सुमारास पोलीस हेल्पलाइन ११२ वर एका हिंदी भाषिक तरुणाने आपल्या मोबाईल वरून संपर्क करत कोणीतरी अज्ञात ऑटो चालकाने आणि त्याच्या इतर एका साथीदाराने अमीर आली सय्यद नामक त्यांच्या गुत्तेदार बळजबरीने ऑटोत बसवून अपहरण केल्याची माहिती दिली. पोलीस हेल्पलाइन ला सदरील घटनेची माहिती मिळताच रात्रीच्या गस्तीवर असलेल्या चार्ली पोलिसांनी नवीन रेनापुर नाक्या जवळ असलेल्या ऑटो पॉईंट कडे धाव घेतली. ...पान २ वर

## आंतरधर्मीय प्रेम हाच दोघांचा गुन्हा ठरला बहिणीच्या प्रियकराचा भावाने गळा चिरला

मुंबई : क्राईम रिपोर्टर

आपली बहीण कुणाच्या तरी प्रेमात पडली आहे आणि तिच्यामुळे आपल्या कुटुंबाची इज्जत खराब होत आहे असे जेंव्हा एखाद्या भावाला वाटते तेंव्हा तो जराही मागचा पुढचा विचार करीत नाही. एकवेळ दोघांनाही सजावण्याचा प्रयत्न करतो आणि एकले नाही तर टोकाचे पाउल उचलतो. धारावीमध्ये एका भावाने अशाच प्रकारे बहिणीच्या प्रेमाला विरोध करीत तिच्या प्रियकराची निर्घुणपणे हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

बहिणीसोबत असलेल्या प्रेमसंबंधाच्या रागातून आरोपीने धारावीतील पुनावाला चाळ येथील एका गारमेंट कारखान्यात २३ वर्षीय तरुणाची हत्या केल्याने खळबळ उडाली आहे. गुन्हे शाखेने अवघ्या काही तासांत साहिल दिनेशकुमार शर्मा (२२) याला अटक केली आहे. अरमान शहा (२३) असे मृताचे नाव असून, तो पुनावाला चाळ येथील एका कारखान्यात काम करत होता. त्याचे शर्माच्या बहिणीसोबत प्रेमसंबंध होते. बुधवारी सायंकाळी ७ च्या सुमारास शर्मा हा अरमान काम करत असलेल्या कारखान्यात आला. त्याने अरमानशी बोलण्याचा बहाणा करत खिशातून मिरची पावडर काढून त्याच्या डोळ्यात फेकली. त्यानंतर, जवळील चाकूने त्याच्या पोटावर वार केले. मदतीसाठी पुढे आलेल्या कारखाना मालक अश्रफ मोहम्मद मतीन शेख (३८) यांच्यावर देखील हल्ला चढवला. यात शहाचा जागीच मृत्यू झाला. हल्ल्यानंतर आरोपी पसार ...पान २ वर

## संशयामुळेच सुखी संसाराची वाताहात झाली पत्नीची हत्या करून पतीने आत्महत्या केली



म्हसवड (सातारा) : क्राईम रिपोर्टर

संशयाने माणसाला पोखरले कि मग त्याचे दुसऱ्या कशात लक्ष लागत नाही. पती पत्नीच्या संसारात संशायामुळेच वितुष्ट येते आणि वाद निर्माण होऊन संसार तुटतो. सातारा जिल्ह्यातील म्हसवड मधील अशाच एका घटनेत पतीचा पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. याच संशयातून पतीने पत्नीची हत्या केली आणि स्वतःही गळफास घेवून आत्महत्या केली.



म्हसवड जवळील माण तालुक्यातील हिंगणी गावातील आसाळवाडा येथे घुटुकडे यांची वस्ती आहे. या वस्तीवर बंडू घुटुकडे हे पत्नी अनिता आई वडिल आणि दोन मुलासह राहयला आहेत. बंडू आणि अनिता याच्या लग्नाला बारा वर्ष झाली होती.दोघांचा संसार सुखी समाधानी चालू होता. त्यांना दोन मुले ही झाले. बंडू घटुकडे याची शेती असल्याने त्यांनी शेती बरोबरच तीन चार जनावरे ही पाळलेली होती.शेतीवर आणि जनावरांच्या उत्पन्नावर त्याचा चरित्रार्थ चालत होता.त्यातून कधी कधी बंडू हा दुसऱ्याच्यात कामाला ही जात होता. सगळे काही बरे चालत होते. त्यातच त्याची अलिकडे बायको अनिता हिच्याबरोबर रोज कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडणे होत होती. बंडू याच्या आई वडिलांना त्याच्यात होत असलेल्या भांडणाचे काही समजत नव्हते. बंडू हा अलकिडे रोज दारू पिऊन येवून घरात बायको अनिता हिला मारहाण करीत शिवीगाळ करीत असायचा बऱ्याच वेळेला नवरा बायकोची भांडणे वस्तीवरील लोकांनी सोडवलेली होती. परंतु त्याची भांडणे काही मिटलेली नव्हती. भांडणात अनितावर चारित्र्याचा संशय घेऊन तिला शिवीगाळ करीत तुझे लफडे मला समजलेले आहे, तु माझ्या संसारात विष कालवित आहेस असे म्हणत तिला हातात सापडेल त्या वस्तुने मारहाण करीत होता. त्यामुळे अनिता ही भांडण झाले की मुलांना ...पान ६ वर

## संशयामुळे लव्ह स्टोरीची शोकांतिका झाली प्रेयसीला मारून प्रियकराने आत्महत्या केली



बुलढाणा : क्राईम रिपोर्टर

प्रियकर प्रेयसीचे एकमेकांवर कितीजरी निस्सीम प्रेम असले तरी या प्रेमात विश्वासही तितकाच महत्वाचा असतो. आणि प्रेमातील विश्वासाला तडा जातो तेंव्हा मनात सुडाची भावना निर्माण होते. बुलढाणा जिल्ह्यातील खामगावमध्ये अशाच एका घटनेत ऋतुजा व साहिल यांचे एकमेकांवर प्रेम होते. पण हल्ली साहिलच्या मनात ऋतुजा विषयी संशय निर्माण झाला होता आणि याच संशयातून प्रेमाची जागा सुडाने घेतली. साहीलने ऋतुजाला एका हॉटेलवर नेवून तिची हत्या केली आणि स्वतःही आत्महत्या केली. या घटनेमुळे खामगावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

बुलढाणा जिल्ह्यातून एक खळबळजनक आणि धक्कादायक बातमी समोर आली आहे. येथील खामगाव शहरातील हॉटेलमध्ये रक्ताच्या थारोळ्यात प्रेयसी आणि प्रियकर दोघांचे मृतदेह आढळले. हॉटेलचा वेटर त्या जोडप्याच्या खोलीत गेला असता त्याने ...पान ६ वर

## काळ्या जादुटोण्यामुळेच दिराचे डोके फिरले करणीच्या संशयावरून वहिनीला ठार मारले



बेळगावी : क्राईम रिपोर्टर

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष उलटली तरी लोकांच्या मनातील जुनाट रूढी परंपरा आणि अंधश्रद्धा कायम आहेत. त्यातूनच अशा अंधश्रद्धाळू लोकांना फसवून भोंदू बाबा आपली दुकाने चालवतात आणि सामान्य माणसाचे शोषण करतात. देशात जादूटोणा विरोधी कायदा असतानाही काळ्या जादूचे प्रकार घडतात. बेळगाव नजीकच्या आमशेत कोलेमळा येथे दोन भावांमध्ये वाद होता. मात्र हा वाद सामोपचाराने मिटवण्याएवजी दोघेही मांत्रिकाकडे जावून एकमेकांच्या विरुद्ध करणी करू लागले. हे प्रकार पुढे इतके वाढले कि मोठ्या भावाने छोट्या भावाच्या पत्नीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

कर्नाटकातील बेळगावी गोवा हायवे वर जोयडा तालुक्यात शिंगरगाव गाव आहे. येथून जवळच असणाऱ्या आमशेत कोलेमाळ गावात धोंडू गंगाराम वरक हे ५५ वर्षीय वृध्द आपल्या पत्नी मुलासह राहयला आहेत. त्याची थोडी फार शेती असल्याने त्या शेतीवरच त्याची उपजिविका चालत होती. त्याच्या शेजारीच त्याचा भाऊ सोनु वरक आणि त्याची पत्नी भाग्यश्री आणि त्यांची मुले राहयला आहेत.सोनु आणि धोंडू याचेत नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडणे होत होती. दोघांच्यात ...पान ६ वर

पान १ वरून...

## एका चंचल तरुणीचे होते चार यार...

बघण्याचेबिन पगारी काम देखीलतो न चुकतावेळेवर करत होता. ज्ञानेश्वरचे इंस्टाग्राम या सोशल मिडीया प्लॅटफॉर्मवर अकाऊंट होते. त्याच्या फ्रेंड लिस्ट मधे नागपूरची सोनाली (काल्पनिक नाव) नावाची एक अल्पवयीन मैत्रीण होती. इंस्टाग्रामच्या माध्यमातून दहीगावचा ज्ञानेश्वर आणि नागपूरची सोनाली हे दोघे एकेमेकांचे मित्र झाले. लवकरच दोघांची चांगली मैत्री झाली आणि त्यांचे एकमेकांवर प्रेम जडले. एके दिवशी नागपूरच्या अल्पवयीन सोनालीने ज्ञानेश्वरला भेटण्यासाठी दहीगावला येण्याचे निश्चित केले. ती खास ज्ञानेश्वरला भेटण्यासाठी रेल्वेने दहीगावला येण्यास एकटीच निघाली. तिला घेण्यासाठी अर्थात पिक अप करण्यासाठी ज्ञानेश्वर खास वेळ काढून दहीगाव येथून भुसावळ रेल्वे स्टेशनवर गेला. दोन प्रेमी जीव भुसावळ रेल्वे स्टेशनवर प्रथमच एकमेकांना भेटले. ती त्याला भेटण्यासाठी खास नागपूर ते भुसावळ व भुसावळ ते दहीगाव असा प्रवास करुन आली. नागपूरची मॉडर्न अल्पवयीन सोनाली दहीगाव या ग्रामीण भागात प्रथमच आली होती. दहीगावचा शेणा मातीने भरलेला रस्ता, बैलगाड्या, केळीचे बाग, सकाळी प्रातर्विधी करण्यासाठी हातात डबा धरुन जाणा-या काही महिला पुरुष आदींचे तिने जवळून दर्शन घेतले. शहरी आणि ग्रामीण भागातील जीवन तिने जवळून पाहिले. पुरब और पश्चिम या सिनेमातील सायरा बानो या नटी प्रमाणे तिने ग्रामीण भाषा ऐकून समजून घेतली. दोन दिवस ग्रामीण जीवनशैली आणि ज्ञानेश्वरचे प्रेम हासिल करुन तीने पुन्हा नागपूरच्या दिशेने प्रयाण केले. या दोन दिवसात ज्ञानेश्वरला हायसे वाटले. जणू काही मिनी ऐश्वर्या राय आपल्या भेटीला आली आणि तिने आपल्याला भरभरुन प्रेम दिले असे त्याला वाटत होत्ते. दहीगाव येथील ज्ञानेश्वर नावाच्या तरुणासोबत आपले प्रेम जडल्याचे तिने घरी आईवडीलांना सांगितले. तेव्हा कोणते दहीगाव आणि हे शहर कुठे येते असा प्रश्न तिला तिच्या आई वडीलांनी केला. दहीगाव हे शहर नसून एक गाव आहे. ते जळगाव जिल्ह्याच्या यावल तालुक्यात सातपुडा डोंगरानजीक वसले असल्याचे तिने तिच्या आई वडीलांना कथन केले. मात्र तिच्या आई वडीलांनी या प्रेम प्रकरणाला विरोध केला. त्यामुळे ती अस्वस्थ झाली. तिला दहीगावला येण्याची पुन्हा ओढ लागली. काही दिवस असेच निघून गेले. तिचे घरी नागपूरला काही मन रमेना. त्यामुळे ती पुन्हा दहीगाव येथे येण्यास निघाली. यावेळी देखील ज्ञानेश्वर तिला पिक अप करण्यासाठी भुसावळ रेल्वे स्टेशनवर गेला. दोघे सोबतच दहीगावला आले. यावेळी जवळपास पंधरा दिवस ती दहीगाव येथे मुक्कामी राहीली. दहीगाव येथील तरुणाचे लग्न नागपूर येथून पळून आलेल्या अल्पवयीन मुलीसोबत होणार असल्याची माहिती यावल पोलिसांना समजली. त्यामुळे यावल पोलिसांनी तिला जळगाव येथे बाल सुधार गृहात दाखल केले. त्यांनंतर तिच्या आई वडीलांना बोलावून तिला त्यांच्या स्वाधीन करण्यात आले. अशा प्रकारे ज्ञानेश्वर आणि सोनाली या दोघा प्रेमीजीवांची जणू काही ताटातुट झाली. ते एकमेकांपासून बिछडले. त्यानंतर दोघांचे मोबाईलवर बोलणे होऊ लागले. नैनोसे कह दे दिन रात ना बहना असा संदेश देत त्याने तिला धीर धरण्यास सांगितले. या सर्व घडामोडी अर्थात एपीसोड नंतर ज्ञानेश्वर पुणे येथे कामधंदा करण्यास निघून गेला. दहीगाव सोडून तो पुणे येथे राहू लागला. मात्र ज्यावेळी तो पुणे येथून घरी दहीगाव येथे परत आला त्यावेळी त्याला नातेवाईक आणि मित्रांकडून वेगळीच माहिती समजली. ज्या सोनालीवर तो जीवापाड प्रेम करत होता तिचे दहीगाव येथीलच तुषार लोखंडे, इमरान पटेल आणि अजून एका तरुणासोबत प्रेम प्रकरण सुरु असल्याचे त्याला समजले. त्यामुळे तो मनातून खचला. आपला प्रेमभंग झाल्याचे शल्य त्याला बोचू लागले. संतापाच्या भरात त्याने तिला फोन लावून चांगलेच खडसावले. तिला अद्वातद्वा बोलून त्याने त्याच्या मनातील सर्व आग तिच्याकडे ओकली. मनातील गरळ अर्थात दिल की भडास त्याने बाहेर काढली. मी तुझ्यावर जीवापाड प्रेम केले आणि तु पंधरा दिवसांच्या मुक्कामात दहीगावातील दुस-या मुलांसोबत सुत जुळवून घेतले, मला साधी भणक देखील लागू दिली नाही असे म्हणत त्याने तिला चांगलेच फैलावर घेतले. त्यानंतर ज्ञानेश्वरने तिच्यासोबत अबोला धरला. तो कमी अधिक प्रमाणात देवदास बनला. न तु जमी के लिये है ना आसमा के लिये अशी त्याची गत झाली. तो उदास मनाने पुन्हा पुणे येथे कामधंदा करण्यासाठी निघून गेला. मात्र तिच्या सहवासाचे क्षण त्याच्या नजरेसमोरुन जात नव्हते. कोण होतीस तु? का आली माझ्या जीवनात? का मला वेड लावले? असे प्रश्न तो स्वत:च्या मनात सोनालीस विचारत होता. ज्ञानेश्वर पुणे येथे गेल्यानंतर सोनाली पुन्हा एकवेळा दहीगाव येथे आली. परतीच्या प्रवास भाड्यासाठी तिला तुषारने पैसे दिले आणि इमरान पटेल हा तिच्यासोबत नागपुर पर्यंत गेला होता अशी माहिती ज्ञानेश्वरला समजली. त्यामुळे तो मनातून अजूनच खचला. गावातील इमरान पटेल हा तिचा पिच्छा पुरवत असल्याची माहिती ज्ञानेश्वरला समजली. त्यामुळे त्याला इमरानचा राग आला. एकट्या सोनालीवर प्रेम करणाऱ्यांची दहिगाव येथील तरुणांची संख्या जवळपास तिन ते चार झाली होती. त्या यादीत ज्ञानेश्वरसह गावातील तुषार लोखंडे, इमरान पटेलआणि अजून एक जण असे तिन ते चार जणांचा समावेश होता. या सर्व गोष्टी ऐकून ज्ञानेश्वरचे पुणे येथे काही मन रमत नव्हते. त्याच्या मनात नेहमी सोनाली आणि तिच्यावर प्रेम करणारे इतर तरुण यांचे विचार येत होत्ते. इमरान हा तिच्यासोबत बळजबरी करत असल्याची त्याला माहिती मिळाली. त्यामुळे तो फास्ट ट्रेनने पुणे येथून भुसावळ आणि तेथून दहीगाव येथे आला. तु मला भेटण्यासाठी आत्ताच्या आता नागपूर येथून दहीगावला ये असे फर्मान त्याने सोनालीस सोडले. तु जर मला भेटण्यासाठी दहीगावला आली नाही तर मी जीव देईन आणि तुझ्यासह तुझ्या घरातील सदस्यांची नावे पोलिसांना सांगून टाकीन असा त्याने तिला दम दिला. त्यामुळे सोनाली यावल येथे आली मात्र ज्ञानेश्वरला भेटली नाही. ती फक्त इमरान यास भेटली आणि निघून गेली. याचा अर्थ ती आपल्यापेक्षा इमरानवर प्रेम करत असल्याची ज्ञानेश्वरला जाणीव झाली. त्यामुळे इमरान हा आपल्या आणी सोनालीच्या प्रेमात अडथळा ठरत असल्याचे त्याला समजले. इमरान हा ज्ञानेश्वरच्या नजरेत खलनायक झाला. त्यामुळे या खलनायक इमरानला कायमचा धडा शिकवण्याचे ज्ञानेश्वरने ठरवले. दहीगाव येथीलच तुषार लोखंडे या तरुणाची देखील गत अशीच काहिशी होती. तुषार लोखंडे या तरुणाचे देखील ज्ञानेश्वर पाटील प्रमाणेच नागपूरच्या सोनालीसोबत प्रेमप्रकरण सुरु होते. एकट्या सोनालीच्या अवतीभोवती श्वान पथकाप्रमाणे दहीगाव येथील ज्ञानेश्वर पाटील, तुषार लोखंडे, इमरान पटेल आणि अजून एक असे सर्वजण घुटमळत होते. तुषारच्या मोबाईलचा वापर करुन इमरान हा सोनालीसोबत बोलत होता.

आपल्या ऐवजी इमरान हा सोनालीसोबत लग्गा लावत असल्याचे बघून तुषारला इमरानचा राग येत होता. ज्ञानेश्वर पाटील याचा दहीगाव येथील एक मित्र होता. पुरुषोत्तम सोनवणे असे त्याच्या मित्राचे नाव होते. पुरुषोत्तम सोनवणे याचे गावातीलच एका मुलीसोबत प्रेम प्रकरण सुरु होते. ती मुलगी पाठवत असलेले व्हाटस ॲपप मेसेज अज्ञानी पुरुषोत्तमला वाचता येत नव्हते. त्यामुळे तो ते मेसेज त्याच्या एका मित्राकडून समजून घेत तिला उत्तर देत असे. पुरुषोत्तमचे त्या मुलीसोबत प्रेम प्रकरण सुरु असल्याची कुणकुण इमरान पटेल याला लागली. या प्रेम प्रकरणात देखील इमरान हा खलनायकाची भुमिका साकारत होता. त्याने त्या मुलीच्या घरी खरा प्रकार सांगून टाकला. त्यामुळे पुरुषोत्तमसोबत आपल्या मुलीचे प्रेम प्रकरण आकार घेत असल्याची माहिती तिच्या आई वडीलांना समजली. त्यामुळे तिच्या घरात वाद सुरु झाले आणी तीला बेदम मारहाण झाली व दोघांच्या प्रेमप्रकरणाला ब्रेक लागला. अशा प्रकारे पुरुषोत्तम आणि त्याच्या प्रेयसीच्या वाटेत इमरान हा अडथळा म्हणून पुढे आला. अशा प्रकारे दहीगाव येथील ज्ञानेश्वर पाटील, तुषार लोखंडे आणि पुरुषोत्तम सोनवणे या तिन तरुणांच्या प्रेम प्रकरणात इमरान पटेल हा एक प्रकारे व्हिलनच्या रुपात वावरत होता. तिघा तरुणांच्या प्रेमिकांना इमरान आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करत होता. तिघा तरुणांच्या दोघा प्रेमिकांसोबत संबंध वाढवून इमरान आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत होता. त्यामुळे एकाच वेळी ज्ञानेश्वर पाटील, तुषार लोखंडे आणि पुरुषोत्तम सोनवणे हे तिघे तरुण त्याच्यावर राग धरुन होते. त्यातून ज्ञानेश्वर पाटील, तुषार लोखंडे आणि पुरुषोत्तम सोनवणे हे तिघे तरुण एकत्र आले. तिघांनी मिळून इमरान पटेल याचा काटा काढण्याचे निश्चित केले. २९ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ज्ञानेश्वर पाटील आणि पुरुषोत्तम सोनवणे हे दोघे एकमेकांना भेटले. त्या कालावधीत काही वेळासाठी त्यांची भेट इमरानसोबत झाली. थोडा वेळाने इमरान तेथून निघून गेला. इमरान निघून गेल्यानंतर पुरुषोत्तम सोनवणे याने त्याच्या हातातील चांदीची अंगठी मोडून पैशांची व्यवस्था केली. त्या रकमेतून त्याने त्याची काही कामे पुर्ण केली. त्यानंतर दोघे एका हॉटेलमधे मद्यप्राशन करण्यासाठी गेले. मद्य प्राशन केल्यानंतर दोघे यावल बस स्थानक परिसरात आले. त्याठिकाणी त्यांना इमरान पटेल व तुषार लोखंडे असे दोघे जण सोबत भेटले. त्यामुळे आता ज्ञानेश्वर पाटील, पुरुषोत्तम सोनवणे, तुषार लोखंडे, इमरान पटेल असे चौघे जण एकत्र जमले होते. त्यात अजून एका तरुणाची भर पडली व एकुण पाच जण झाले. पाचही जण एका हॉटेलमधे मद्यप्राशन करण्यास बसले. सम विचारी ज्ञानेश्वर पाटील, तुषार लोखंडे आणि पुरुषोत्तम सोनवणे या तिघांच्या मनात खलनायक इमरान पटेल बद्दल बदल्याची आग होती. मद्यप्राशन आटोपल्यानंतर पाचवा तरुण त्याच्या घरी निघून गेला. सायंकाळी सात वाजेच्या सुमारास ज्ञानेश्वर पाटील, पुरुषोत्तम सोनवणे, तुषार लोखंडेव इमरान पटेल असे चौघे जण मोटार सायकलने यावल येथून दहीगाव येथे आले. दहीगाव येथील चौधरी वाडयानजीक सिमेंटच्या दुकानाजवळ ज्ञानेश्वरने मोटार सायकल उभी केली. इमरान पटेल व पुरुषोत्म सोनवणे या दोघांना थोडा वेळ खाली उतरण्यास सांगण्यात आले. तुम्ही थोडा वेळ थांबा आम्ही लगेच परत येतो असे म्हणत ज्ञानेश्वर पाटील याने तुषार लोखंडे याला सोबत घेत मोटार सायकलने त्याचे घर गाठले. घरी येताच ज्ञानेश्वरने त्याच्या घरात लपवून ठेवलेला धारदार कोयता तुषारच्या ताब्यात दिला. लागलीच दोघे जण पुरुषोत्तम आणि इमरान या दोघांजवळ आले. पुन्हा चौघे जण मोटार सायकलवर एकत्र बसले. दरम्यान तुषारने तो कोयता गुपचुप पुरुषोत्तमच्या ताब्यात बेमालुमपणे दिला. मोटार सायकलवर चालकाच्या रुपात ज्ञानेश्वर पाटील बसला होता. त्याच्या मागे तुषार लोखंडे, त्याच्या मागे पुरुषोत्तम सोनवणे आणि सर्वात मागे इमरान पटेल असे चौघे बसले होते. दहिगावच्या पुढे विरावली गावाच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यालगत खिरवा गाड रस्त्याजवळ ज्ञानेश्वर पाटील याने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल उभी केली. त्यावेळी परिसरात रात्रीची स्मशान शांतता पसरली होती. आता इमरान पटेल याची मरणाची घटीका अगदी समीप आली होती. त्याचे तिघे हल्लेखोर एकाच विचाराने एकत्र जमले होते. पुरुषोत्तम सोनवणे याने त्याच्याकडील कोयत्याचा पहिला वार मद्याच्या नशेतील इमरान पटेल याच्या मानेवर केला. कोयत्याचा पहिला वार होताच इमरान पटेल रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर कोसळला. इमरानवर कोयत्याचा दुसरा व तिसरा हल्ला अनुक्रमे ज्ञानेश्वर पाटील व तुषार लोखंडे या दोघांनी केला. इमरान मयत झाल्याची खात्री होताच त्याला तशाच अवस्थेत सोडून तिघे जण मोटार सायकलने माघारी फिरले. वाटेत पुरुषोत्तम सोनवणे याने रक्ताने भरलेला कोयता लपवला. त्यानंतर तिघे जण यावल येथे आले. ज्ञानेश्वरने तुषारला भुसावळ रस्त्यावर सोडून देत पुरुषोत्तमसह बस स्थानक गाठले. त्याठिकाणी एकाने दोघांना घाबरलेल्या अवस्थेत बघून काय झाले अशी विचारणा केली. त्यावर आम्ही मर्डर करुन आलो असून पोलिस स्टेशनला जमा होण्यास जात असल्याचे सांगितले. ज्ञानेश्वर पाटील आणि पुरुषोत्तम सोनवणे हे दोघे तरुण स्वत:हून यावल पोलिस स्टेशनला दाखल झाले. त्यांनी ठाणे अंमलदाराला आम्ही एकाचा मर्डर करुन आल्याचे सांगितले. इमरान युनुस पटेल असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव असल्याचे देखील दोघांनी पोलिसांना सांगितले. खून झाला आणि खूनी स्वत:हून पोलिस स्टेशनला हजर झाल्याचे ऐकून संबंधीत ठाणे अंमलदार देखील काही वेळासाठी अवाक झाले. त्यांनी लागलीच या घटनेची माहिती पोलिस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांना सांगितली. माहिती मिळताच पोलिस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांनी दोघे संशयीत तरुण व आपले सहकारीसहायक पोलिस निरीक्षक अजय वाढवे, पोलिस उप निरीक्षक अनिल महाजन, पोलिसकर्मी सागर कोळी व राजेंद्र पाटील यांच्यासह घटनास्थळी धाव घेतली. विरावली रस्त्यावर घटनास्थळी इमरान पटेल या तरुणाचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह पडून होता. या घटनेची माहिती समजल्यानंतर पोलिस उप अधिक्षक अनिल बडगुजर यांनी देखील आपले सहकाऱ्यांसह घटनास्थळ गाठत अधिकारी व कर्मचारी वर्गाला तपासकामी महत्वाच्या सुचना दिल्या. मारेकरी स्वत:हून पोलिस स्टेशनला हजर झाले असले आणी वरवर तपास सोपा वाटत असला तरी हा किचकट तपास पुर्ण करण्याची जबाबदारी पोलिस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक अनिल महाजन यांच्यावर आली. मयत इमरान पटेल याचे वडील युनुस इसा पटेल यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार याप्रकरणी यावल पोलिस स्टेशनला खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गु.र.नं. ३५७/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३चे कलम १०३(१), ३(५) नुसार हा गुन्हा नोंद करण्यात आला. शव विच्छेदन, घटनास्थळ पंचनामा, मृतदेह पंचनामा, फॉरेन्सिक लॅब पथकाचा तपास आदी सोपास्कार पुर्ण करण्यात आले. अटकेतील ज्ञानेश्वर पाटील आणि पुरुषोत्तम सोनवणे या दोघांना यावल येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी आर. एस. जगताप यांच्या न्यायालयासमक्ष हजर करण्यात आले. सुरुवातीला दोघांना न्यायालयाने ४ सप्टेबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली. पोलिस कोठडीची मुदत संपल्यानंतर दोघांना पुन्हा न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पुन्हा पाच दिवसांची ८ सप्टेबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली. पोलिस कोठडी दरम्यान तपासात या गुन्ह्यात तुषार राजेश लोखंडे या तरुणाचा देखील सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्याला देखील अटक करण्यात आली. अशा प्रकारे या गुन्ह्यातील संशयीत आरोपींची संख्या तिन झाली. तपासादरम्यान पुढे आलेल्या तरुणांच्या प्रेम प्रकरणाचा धागा पकडून संबंधीत मुलींची देखील चौकशी करण्यात आली. पोलिस उप निरीक्षक अनिल महाजन यांनी आपले कसब पणाला लावत या गुन्ह्याचा तपास पुढे रेटून नेला. तांत्रीक तपासाची मदत घेत संशयीतांनी गुन्हा करण्यापुर्वी व गुन्हा केल्यानंतरच्या सीसीटीव्ही फुटेजमधील हालचाली व दोघा अल्पवयीन मुलींसोबत संशयीतांसह मयत इमरान पटेल याचा आलेला संबंध अशी कडी जुळवण्यात आली. या प्रकरणाचा तपास पोलिस उप अधिक्षक अनिल बडगुजर, पोलिस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक अजय वाढवे, पोलिस उप निरीक्षक अनिल महाजन, पोलिसकर्मी सागर कोळी व राजेंद्र पाटील यांनी केला. पुढील अधिक तपास पोलिस उप निरीक्षक अनिल महाजन करत आहेत.

## शुल्लक वाद त्याच्या प्राणावर बेतला...

थोड्याच वेळात मोटरसायकलिवरून प्रवास करणाऱ्या दोन पोलिसांनी घटनास्थळ गाठले. रेनापुर नाक्या जवळ असलेल्या एका पान टपरीच्या बाजूला तीन तरुण भांबवलेल्या आणि घाबरलेल्या अवस्थेत उभे होते. तात्काळ पोलिसांनी या तिघाकडे तरुणाकडे आपली नजर फिरवली. पोलिसांनी त्या तिघांना हाटकले असता त्यातील एकाने आपले नाव लोकेशकुमार श्रीराम सिंग (वय २० वर्षे राहणार गव्हाण, जिल्हा अलिगड उत्तर प्रदेश) असे सांगितले. तसेच त्यांनेच ११२ वर कॉल केल्याची माहिती दिली. चार्ली कमांडोने त्यांच्याकडे अधिक माहिती घेतली असता. त्यांचा गुत्तेदार अमीर आली सय्यद याला दोन तरुणांनी आपल्या ताब्यातील ऑटो मध्ये बळजबरीने बसवून नेल्याची माहिती दिली. पोलिसांनी तात्काळ त्यांना कोणत्या दिशेने आटो गेला याबाबत विचारणा केली असता त्यांनी सदरील ऑटो हा लातूर रिंग रोड बायपास ने गेल्याची माहिती दिली. तात्काळ पोलिसांनी त्या दिशेने आपली मोटरसायकल चालवण्यास सुरुवात केली. थोड्याच अंतरावर रिंग रोडच्या कडेला असलेल्या हॉटेल अण्णा व्हेज अँड नॉनव्हेज च्या गेट समोर एक इसम पालथ्या अवस्थेत रक्ताने माखलेल्या स्थितीत निपचित पडलेला दिसला. लगेच पोलिसांनी त्या तीन तरुणांना बोलावून घेतले. रक्ताच्या चारोळ्यात पालथ्या पडलेल्या इसमाला उताणी करून पाहिले असता त्या तिघांनी हाच आमचा गुत्तेदार अमीर आली सय्यद असल्याची माहिती पोलिसांना दिली. तात्काळ गस्तीवर असलेल्या चार्ली पोलिसांनी सदरील घटनेची माहिती विवेकानंद चौक पोलीस ठाण्याला कळवली. विवेकानंद चौक पोलीस ठाण्याच्या ठाणे अंमलदाराने घटनेचा प्राथमिक आढावा घेत वरिष्ठांना खबर केली. विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी आपल्या पोलीस ठाण्यातील कर्मचारी एपीआय अण्णाराव खोडेवाड, पीएसआय सुनील हराळे, पोलीस कॉन्स्टेबल खुर्रम काझी, रवी गोंदकर, धैर्यशील मुळे, यांना सोबत घेत घटनास्थळाकडे धाव घेतली. काही मिनिटातच विवेकानंद पोलिसांनी घटनास्थळ गाठले. विवेकानंद पोलीस ठाण्यात चौक हद्दीत असलेल्या रिंग रोड बायपास रोड लगत असलेल्या अण्णा हॉटेल समोर एक ४० ते ४५ वर्षीय तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याच्या शरीरावर, विशेषता पोटात छातीत चाकू सारख्या धारदार शस्त्राने वार केल्याच्या खुना दिसून येत होत्या. दरम्यान विवेकानंद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी तेथे उपस्थित असलेल्या तीन परप्रांतीय तरुणाकडे अधिक चौकशी केली असता. रक्ताच्या थारोळ पडलेला तरुण हा अमीर अली सय्यद असून तो सायगाव येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी या तिघाकडे अधिक माहिती घेतली असता त्यातील एकाने आपले नाव लोकेशकुमार सिंग आसल्याचे सांगून त्याच्यासेबत आसलेल्या इतर दोघांचे नावे अनूक्रमे सचिनकुमार आणि ईसेन्द्र कुमार असल्याचे पोलिसांना सांगितले. तसेच ते तिघेही उत्तर प्रदेश येथील रहिवाशी असून ते सर्वजण पेंटिंग चे काम करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तसेच ते गेल्या महिन्यामध्ये अमीर अली सय्यद यांच्याकडे पेंटिंगचे काम करण्या साठी सोलापूर येथे आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तात्काळ विवेकानंद पोलीस ठाण्यात हे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी आंबाजोगाई तालुक्यातील सायगाव पोलिसांना संपर्क साधून अमीर अली सय्यद यांच्या नातेवाईकांना कल्पना दिली. दरम्यान घटनास्थळावर अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी भेट दिली. वरिष्ठ पोलिसांनी विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना पंचनामाचे आदेश दिले. पोलिसांनी पंचनाम्यात सुरुवात केली. मयत अमीर सय्यद यांच्या शर्टच्या खिसा फाटलेला दिसत होता. तसेच त्याच्या खिशातील रोख रक्कम आणि त्याचा मोबाईल गायब असल्याचेही पोलिसांच्या लक्षात आले. बहुतेक हा खून वाटमारीतुन झाला असावा असा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून वर्तविण्यात येत होता. मयत आणी मारेकरी यांच्यात बरीच झटापट झाल्याच्या खुणा घटनस्थळावर दिसून येत होत्या. दरम्यान विवेकानंद चौक पोलीसांनी आजूबाजूचा परिसर पिंजून काढून आवश्यक ती माहिती घेतली. विवेकानंद चौक पोलीसांनी पंचनामा आटोपुन प्रेत उत्तरणीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात नेण्याची ताजबीज केली.मयतासोबत असलेला कामगाराच फिर्यादवरुन पो.स्टे. विवेकानंद चौक लातुर येथे गुरन ६४७/२०२५ कलम १०३(१),१४०(४), ३११,३(५) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्र विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड यांच्या हाती देण्यात आले. सर्वप्रथम एपीआय खोडेवाड यांनी या प्रकरणातील प्राथमिक माहिती घेण्यास सुरुवात केली. मूळचा बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील मौजे सायगाव येथे राहणारा अमीर आली सय्यद हा वसाहती पेंटिंगचे काम करणारा गुत्तेदार होता. तो काही महिन्यापासून सोलापूर जिल्ह्यात पेंटिंगचे काम करत होता. अशातच त्याला वसाहत पेंटिंगचे मोठे काम मिळाले होते. त्यामुळे त्याला बिल्डिंग पेंटिंगचे काम करणाऱ्या कामगाराची कमतरता भासत होती म्हणून त्यांनी उत्तर प्रदेशातून लोकेशकुमार सिंग, सचिनकुमार व इशंद्रकुमार या तीन कामगारांना सोलापूर येथे सप्टेंबर महिन्यात बोलवून घेतले होते. मात्र मधल्या काळात जोरदार पाऊस झाल्याने त्याचे काम बंद झाले होते. त्यामुळे गुत्तेदार अमीर सय्यद यांनी लोकेश कुमार सिंग व त्याचे मित्र सचिन कुमार, इसेन्द्र कुमार यांना आपण लातूर येथे जाऊया आणि तेथे माझ्या गावी तुम्हाला काम देतो व तेथेच तुमच्या पैशाचा हिशोब करतो असे सांगितले यावरून दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी गुत्तेदार अमीर सय्यद, लोकेश कुमार सिंग, सचिनकुमार व इयंद्रकुमार असे सगळेजण मिळून रात्री ८ वाजण्याच्या सुमारास सोलापूर येथून एसटी बसने लातूरकर निघाले. दरम्यान ते रात्री १ वाजण्याचा सुमारास लातूर येथील उड्डाण पुलाजवळ उतरले तेथून अमीर सय्यद हा या तिघांना आपल्या गावी सायगाव येथे घेऊन जाणार होता. यासाठी हे सर्वजण रात्री दीड वाजण्याच्या सुमारास नवीन रेणापूर नाका येथे आले. त्यावेळी रेनापुर नाक्यावर एक ऑटो उभा होता. त्यास अमीर सय्यद यांनी सायगाव येथे जाण्यासाठी ऑटो भाडे विचारले आणि चौकशी केली तेव्हा त्या ऑटो चालकाने सायगाव येथे जाण्यासाठी ८०० रुपये भाडे द्यावे लागेल असे सांगितले. ऑटो भाडे जास्त होत असल्याने अमीर सय्यद यांनी आपण रेल्वे स्टेशनला जाऊ असे म्हणून तोच ऑटो १२० रू रुपये भाड्याने ठरववत रेल्वे स्टेशन कडे जाण्यासाठी ठरवलं. दरम्यानच्या काळात हे चौघेजण ऑटो मध्ये बसत असताना पाठीमागून एका ऑटो येऊन अमीर सय्यद व त्याचे कामगार बसत असलेल्या ऑटोला धक्का दिला. तेव्हा आमिर यांनी पाठीमागून धक्का दिलेल्या ऑटो चालकास आम्हाला धक्का का दिलास मार लागला असता की असा संवाद केला. तेव्हा पाठीमागून धक्का दिलेल्या ऑटो मध्ये बसलेल्या चॉकलेटी रंगाचा शेर्ट घातलेल्या अंदाजे २५ वर्षीय तरुणांनी खाली उतरून आमिर सय्यद व त्यांच्या कामगारांशी हुजत घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर अमीर सय्यद आणि त्यांच्या कामगारांनी सदर तरुणाची माफी मागितली. तेव्हा वाद मिटला. परत अमीर सय्यद आणि त्यांचे कामगार रेल्वे स्टेशनचे भाडे ठरवलेल्या ऑटो मध्ये बसण्यासाठी जात असताना. परत तो ऑटो चालक व त्या ऑटोत बसलेल्या तरुणांनी अमीर सय्यद यास बाहेर ओढून मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यापैकी एकाने आपल्या खिशातून चाकू काढून आणी आमीर सय्यद याच्या छातीत खूपसला. तेव्हा अमीर सय्यद यांच्या छातीतून रक्त निघाले. त्यानंतर त्या दोघांनी अमीर सय्यद यांनी ठरवलेल्या ऑटो चालकाला दम भरून तेथून निघून जाण्यास सांगितले. तेव्हा तो ऑटोवाला निघुन गेला. त्यानंतर त्या दोघांनी आमीर सय्यद यास मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच चाकूचा धाक दाखवून त्याच्या जवळील मोबाईल हिसकावून घेतला. तेव्हा अमीर सय्यद यांनी त्याला विरोध करत असताना त्यातील एकाने समीर याला ऑटोत घाल असे संबोधले. दरम्यान समीर नामक तरुणांनी अमीर सय्यद याला बळजबरीने ऑटोत घातले. त्यावेळेस अमीर सय्यद सोबत असलेल्या तिघांनी अमीर सय्यद याला सोडून द्या अशी विनवणी केली असता त्यांनाही चाकूचा धाक दाखवून त्या दोघांनी अमीर सय्यद याला ऑटोत बसवून पलयान केले. घाबरलेल्या तिघा परप्रांतीय कामगारांनी पुढे चालत जाऊन एका दुकानाबाहेर बसलेल्या एका व्यक्तीला सदरील प्रकार सांगितला तेव्हा त्यांनी ११२ नंबर वर कॉल करण्यास सांगितले. त्यावरून लोकेश कुमार सिंग यांनी ११२ नंबर वर कॉल करून पोलिसांची मदत मागवली एवढी माहिती पोलिसांच्या हाती आली.विवेकानंद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड यांनी तपासाचे चक्र गतिमान करत मिळालेल्या माहितीवरून समीर नावाच्या तरुणाचा शोध घेण्यास सुरुवात केली. नवीन रेणापूर नाका परिसरात पोलिसांचे पथक पाठवून रात्री भाडे मारणाऱ्या ऑटो चालकांचा शोध घेवुन त्यांच्याकडे अधिक चौकशी केली मात्र पोलिसांना मनावा तितका प्रतिसाद मिळाली नाही. एका गुप्त खबऱ्याच्या माहितीवरून सदरील प्रकरणातील ऑटोचालक हा साई रोड भागात असाल्याची गुप्त माहिती विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आणणार खोडेवाड यांना मिळाली. मिळालेल्या माहिती आधारे एपीआय खोडेवाड यांनी पोलिसांचे एक पथक तयार केले या पथकात पो.कॉ. वसंत मुळे, पोउपनि रेडेकर, पोलीस अमंलदार खुर्रम काझी, सुनिल हराळे, रविंद्र गोंदकर, यशपाल कांबळे, रणविर देशमुख, धैर्यशिल मुळे, सचिन राठोड, गणेश यादव,आनंद हल्लाळे, दयानंद उपासे, महेबुब शेख, चालक दिपक कांबळे तुमचा समावेश करण्यात आला. या पथकाने मिळालेल्या माहितीनुसार साईरोड परीसरातील एका घरावर छापा मारून या प्रकरणातील संशयित आरोपी समीर दिलावर शेख व एक विधीसंघषग्रर्स्त बालकास ताब्यात घेतली त्यांना विवेकानंद पोलीस ठाण्यात हजर करून अधिक चौकशी केली असता त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. अमीर सय्यद याच्या जवळील मोबाईल हिसकावून घेतला असता त्याने विरोध केला असल्यामुळे त्याला आपण ऑटो मध्ये बळजबरीने घालून पोबारा केला व पुढे त्याच्याकडे असलेली रोख रक्कम हिसकावण्याचा प्रयत्न केला असता त्याने विरोध केला तेव्हा त्याच्यावर आणखी चाकूचे वार करून त्याला ठार केल्याची कबूल केली. समीर दिलावर शेख याच्यावर शहरातील पोलीस ठाण्यात लुटमारीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाच्या तपासात आरोपीने गुन्ह्यात वापरलेला ऑटो, चाकू पोलिसांनी हस्तगत केला असून पुढील तपास विवेकानंद पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड करीत आहेत. सदरील कामगीरी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड , पो.कॉ. वसंत मुळे, पोउपनि रेडेकर, पोलीस अमलदार खुर्रम काझी, सुनिल हराळे, रविंद्र गोंदकर, यशपाल कांबळे, रणविर देशमुख, धैर्यशिल मुळे, सचिन राठोड, गणेश यादव,आनंद हल्लाळे, दयानंद उपासे, महेबुब शेख, चालक दिपक कांबळे यांनी केली.

## आंतरधर्मीय प्रेम हाच दोघांचा गुन्हा...

झाला. घटनेची वर्दी लागताच धारावी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केले. आरोपी जाळ्यातआरोपी कोणताही मोबाइल फोन वापरत नसल्यामुळे त्याच्यापर्यंत पोहोचण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. पोलिसांनी गुप्त बातमीदारांची मदत घेऊन त्याचा शोध घेतला. गुन्हे शाखेच्या कक्ष ५ चे पोलिस निरीक्षक घनश्याम नायर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असताना त्याला राजीव गांधी नगर परिसरातून ताब्यात घेतले.

क्राईम संध्या सोमवार दि. १३ ऑक्टोबर २०२५ ते रविवार दि. १९ ऑक्टोबर २०२५ लातूर/पालघर/सोलापूर www.crimesandhya.com ३

# गिरकचाळच्या वाळू माफियांना अभय देतंय कोण?



**देवणी : वार्ताहर**

गिरकचाळ येथील मांजरा नदीपात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्या माफियां विरोधात ९ ऑक्टोबर २०२५ रोजी मोठ्या थाटात संयुक्त कारवाई करण्यात आली. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना करण्यात आलेल्या तक्रारीवरून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या आदेशाने सहा बोटी पकडण्यात आल्या. मात्र, धक्कादायक म्हणजे अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसून ना गुन्हे दाखल झाले, ना बोटी जप्त झाल्या परिणामी संपूर्ण प्रकरणावर संशयाची छाया पडली आहे.

**तक्रार, व्हिडीओ, लोकेशन सादर करूनही कार्यवाही 'डोळ्यात धूळ'**

अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समितीचे संस्थापक अध्यक्ष सौदागर मोहम्मद रफी यांनी महसूल मंत्र्यांना जीपीएस लोकेशन, फोटो व व्हिडिओसह सविस्तर तक्रार सादर केली होती. त्यानंतर जिल्हास्तरीय पथक, दोन्ही तालुक्यांचे तहसीलदार, महसूल व पोलीस प्रशासनाने संयुक्त कारवाई करत गिरकचाळ येथे बेकायदेशीर वाळू उपसाच्या सहा बोटी पकडल्या. परंतु, एवढ्या मोठ्या कारवाईनंतरही ना बोटी नष्ट झाल्या, ना आरोपींवर गुन्हा दाखल झाला, हे आश्चर्यकारक आहे. परिणामी जनतेमध्ये संताप आणि संशय वाढू लागला आहे.

**जनतेत चर्चा : कारवाई की सेटिंग?**

स्थानिकांमध्ये चर्चा रंगली आहे की, ही केवळ 'कागदी कारवाई' असून बोटी दर महिन्याला चार लाख रुपयांच्या हप्त्यावर 'सुरक्षित' आहेत. वास्तविक गुन्हेगार कोठे आहेत? बोटी नदीतून बाहेर पडताना अधिकाऱ्यांचे व्हिडिओत स्पष्ट दर्शन होत असताना, प्रत्यक्षात वाळू तस्कर अजूनही मोकाटच!

**पोलीस बंदोबस्तातही 'गुप्त सेटिंग'चा गंध?**

कारवाईवेळी देवणी व शिरूर अनंतपाळ पोलीस दलाचा मोठा फौजफाटा तैनात होता. परिसरात बघ्यांची गर्दी उसळली होती. पण एवढ्या मोठ्या कारवाईनंतरही कोणताही ठोस निकाल लागलेला नाही. प्रश्न असा की, जेव्हा पुरावे आहेत, आरोपी स्पष्ट आहेत, बोटी पकडल्या गेलेल्या आहेत तरीही कारवाई का नाही? काय प्रशासन अवैध वाळू तस्करीवर हात फिरवतंय? कारवाई फक्त दिखावा, मंथली हप्त्यावर सर्व सुरळीत?

**नागरिकांची संतप्त प्रतिक्रिया**

हा प्रकार जर तात्काळ थांबवला नाही, तर शासनाच्या कार्यप्रणालीवर जनतेचा विश्वास उडण्याची शक्यता नाकारता येणार नाही. उपविभागीय अधिकारी निलंगा शरद झाडके यांना अवैध वाळू संदर्भात केलेल्या कार्यवाही बद्दल फोनवर संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की काय कारवाई झाली हे तहसीलदारांकडेच माहिती आहे आपण तहसीलदार अशी संपर्क साधावा. निलंगा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांच्याशी फोनवर संपर्क साधले असता त्यांनी सांगितले की गिरकचाळ व हेळंब येथे अवैध वाळू उसाच्या बोटी मिळाल्या आहेत परंतु आणखीन कोणता गुन्हा दाखल करण्यात आला नाही रात्री उशीर झाल्यामुळे शुक्रवारी दुपारपर्यंत गुन्हा दाखल होईल असे तहसीलदार यांनी सांगितले सदर सापडलेल्या बोटी ह्या जप्त करून शासनाची परवानगी घेऊन त्या बोटीचा लिलाव करण्यात येईल अशी माहिती निलंगा तहसीलदार यांनी दिली असल्याचे वरील सर्व माहिती आन्याय आत्याचार भ्रष्टाचार विरोधी समितीचे संस्थापक अध्यक्ष महमद रफी सौदागर यांनी 'क्राईम संध्या'शी बोलताना सांगितले.

# लातूर येथे वैशालीताई देशमुख यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा




**लातूर : वार्ताहर**

लातूर तालुक्यातील निवळी येथील विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त साखर कारखान्याच्या वतीने शुक्रवार दि. १० ऑक्टोबर रोजी दुपारी कारखाना स्थळी आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिर आयोजीत करण्यात आले होते, त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच १५ इनफिल्डरचे व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे व सर्व संचालकांच्या उपस्थितीत पुजन करण्यात आले. विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त दुपारी कारखाना स्थळी आरोग्य शिबीर घेण्यात आले. या शिबीरात आरोग्य तपासणी करुन पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर १५ इनफिल्डरचे व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे व सर्व संचालकांच्या उपस्थितीत पुजन करण्यात आले. या आरोग्य शिबीरात डॉ. अभिजीत यादव, डॉ. बजरंग खडबडे, डॉ.शंकर साबळे, डॉ.विजय कसबे, डॉ. जावेद तांबोळी डॉ. कैफ काझी, वैदयकीय अधिकरी डॉ.नंदकीशोर निकते यांनी तपासणी व आरोग्य उपचार केले. यावेळी त्यांना बालाजी कदम, सुनील यादव, काशीनाथ भातमोडे, अतिश मस्के, पंकज किनगावकर, स्वप्नील आव्हाड यांनी मदत केली. या शिबीराचा २०० कर्मचारी यांनी लाभ घेतला. या कार्यक्रमास कारखान्याचे व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील संचालक सर्वश्री अमृत हरिश्चंद्र जाधव, अनंत व्यंकटराव बारबोले, नरसिंग दगडू बुलबुले, गोवर्धन मोहनराव मोरे, रणजित राजेसाहेब पाटील, रसूल दिलदार पटेल, तात्यासाहेब छत्तू पालकर, हणमंत नागनाथराव पवार, रामराव विश्र्वनाथ साळुंके, दीपक अर्जुन बनसोडे, शाम भारत बरुरे, सुभाष खंडेराव माने, रमेश देशमुख यांच्यासह सभासद, ठेकेदार, अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते. यावेळी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

## मैदानी स्पर्धेत कॉक्सिटचे यश

**लातूर : वार्ताहर**

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ व येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाच्यावतीने घेण्यात आलेल्या मैदानी स्पर्धेत येथील कॉक्सिट महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केले आहे. महाविद्यालयाची वैष्णवी जाधव हिने भालाफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. विभागीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. हातोडा फेक स्पर्धेत श्रावणी उडगे द्वितीय आली आहे. तिचीही विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तिहेरी उडी स्पर्धेत ओंकार माळी या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक पटकावला. अभिषेक शिंदे या विद्यार्थ्याने शंभर मीटर धावणे स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम.आर.पाटील, उपाध्यक्ष एल.एम.पाटील, प्राचार्य डॉ. व्ही.ए. जाधव, उपप्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, उपप्राचार्य डॉ. व्ही.व्ही. भोसले, डॉ.डी.आर. सोमवंशी, ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. बालकिशन देवडे, प्रबंधक संतोष कांबळे, अधीक्षक प्रदीप कावळे यांनी कौतुक केले आहे.

## तृप्ती देसाई यांची लातूर शहरातील अतिवृष्टी आपदग्रस्तांना प्रत्यक्ष मदत

**लातूर : वार्ताहर**

शहरात झालेल्या अतिवृष्टीने ग्रस्त कुटुंबांना सामाजिक संस्था, संघटना यांनी मदत करावी असे आवाहन माझं लातूर परिवाराने केले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी स्वतः लातूरात येऊन भूमाता फाउंडेशनच्या माध्यमातून आपदग्रस्तांना अन्नधान्याचे किट देऊन प्रत्यक्ष मदत केली. भूमाता ब्रिगेड आणि भूमाता फाउंडेशनच्या माध्यमातून एक महिनाभर पुरेल इतके धान्याचे किट मदत म्हणून आपदग्रस्त कुटुंबातील महिलांना देण्यात आले. घरात पाणी शिरल्याने अनेकांचे भरपूर नुकसान झाले आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर भूमाता



फाउंडेशनच्या माध्यमातून मिळालेले किट घेऊन अनेक महिला भाऊक झाल्या होत्या. तसेच बुधोडा येथील माणूस प्रतिष्ठान संचलित माझं घर येथील आश्रमास भेट देऊन तेथील नाविन्यपूर्ण उपक्रमांची, झालेल्या नुकसानीची माहिती घेतली. यापुढील काळात माझं घर येथील बालकांना शक्य होईल ते सर्व सहकार्य करणार असल्याचा शब्द यावेळी बोलताना देसाई यांनी दिला व आश्रमासाठी प्रत्यक्ष अन्नधान्याची मदत केली. सरकारने सुद्धा पंचनामे केले आहेत परंतु तातडीने प्रत्येक कुटुंबाला ठरल्याप्रमाणे मदत पोहोचवणे गरजेचे आहे तरच त्यांच्या घरी दिवाळी साजरी होईल अशी मागणी तृप्ती देसाई यांनी राज्यशासनाकडे केली आहे. याप्रसंगी माझं लातूर परिवाराचे प्रमुख सतीश तांदळे, उमेश कांबळे, डॉ जुगलकिशोर तोष्णीवाल, उमेश कांबळे, संदीप पाटील, वेदप्रकाश भुसनुरे, अमोल शिंदे, माधव सूर्यवंशी, ज्ञानेश्वर महामुनी, सलमान सय्यद, विकास साळुंके, जाकीर सय्यद यांच्यासह भूमाता ब्रिगेड, फाउंडेशनच्या महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

## चलबुर्गा येथील डॉ.अंकुश परिहार यांची प्रादेशिक सहआयुक्त पदी नियुक्ती

**औसा : वार्ताहर**



औसा तालुक्यातील चलबुर्गा येथील डॉ अंकुश तुळशीराम परिहार यांची महाराष्ट्र शासनाच्या पशुवैद्यकीय विभागामध्ये प्रादेशिक सह आयुक्त पदी नियुक्ती झाली आहे. औसा तालुक्यातील चलबुर्गा गावचे भूमिपुत्र डॉ अंकुश तुळशीराम परिहार यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत पशुवैद्यकीय शिक्षण घेऊन उच्च पदावर जाण्याचा बहुमान मिळवला आहे. पुणे विभागामध्ये प्रादेशिक सह आयुक्त पदी नियुक्ती झाल्याबद्दल चलबुर्गा येथील सरपंच, सोसायटीचे चेअरमन, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सर्व ग्रामपंचायतचे सदस्य आणि सोसायटीच्या संचालक व ग्रामस्थांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## औटी चंद्रकला यांना 'आदर्श मुख्याध्यापक' पुरस्कार



**लातूर : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघाचा राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार लातूर शहर महानगरपालिकेच्या पी.एम. श्री सावित्रीबाई फुले लातूर मनपा शाळा क्र. ०९ च्या मुख्याध्यापिका श्रीम. औटी चंद्रकला वसंतराव यांना नुकताच प्रदान करण्यात आला. श्रीमती औटी यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या अथक प्रयत्नांची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक व सांस्कृतिक स्तरावर मोठी प्रगती साधली आहे. सातारा येथे एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार मिळाल्यावर त्यांनी हा सन्मान शिक्षक सहकारी आणि विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे फळ असल्याचे सांगितले, तसेच भविष्यातही शैक्षणिक प्रगतीसाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली. लातूर मनपा शिक्षण मंडळाने त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांचा आदर्श इतरांनीही घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## कै. जनार्दनराव राजेमाने आश्रमशाळेत पोक्सो कायद्याबद्दल मार्गदर्शन

**चाकूर : वार्ताहर**

चाकूर तालुक्यातील जानवळ येथील कै जनार्दनराव राजेमाने आश्रमशाळेत नुकतीच लातूर जिल्ह्याच्या विधी व सेवा प्राधिकरण अंतर्गत लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण (POCSO) कायदा २०१२ संदर्भात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा सत्र न्यायाधीश मा संजयजी जाधव यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर विभागाच्या इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे प्रादेशिक उपसंचालक मा तेजसजी माळवदकर तर प्रमुख पाहुणे म्हणून वेंकटेशजी गिरवलकर, उपविभागीय अधिकारी मंजुषाताई लटपटे, सत्यजित नटवे, संस्था सचिव मुकेशजी राजेमाने, प्राचार्य निलेश राजमाने यांची उपस्थिती होती. २१व्या शतकामध्ये जागतिक महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहणाऱ्या भारतामध्ये युवकांची संख्या जगाच्या पाठीवर सर्वात जास्त आहे. अठरा वर्ष वयापर्यंतच्या बालकांच्या हक्काचे संरक्षण करणे व त्यांच्या जीवनाला व जगण्याला योग्य दिशा मिळणं गरजेचं आहे. शारीरिक व मानसिक बदलांच्या दोलायमान स्थितीमध्ये असणाऱ्या आणि सहजपणे उपलब्ध होऊ शकणारी समाजमाध्यमांवरील विचलित करणारी माहिती, इंटरनेट व पाश्र्िचमात्य संस्कृतीचे अंधानूकरण यांच्या कात्रीमध्ये सापडलेल्या या नाजूक वयातील बालकांना लैंगिक शिक्षण व त्या अनुषंगाने महत्त्वाचा असणाऱ्या पोक्सो कायद्याबद्दलची योग्य माहिती मिळावी या हेतूने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मनोगतात बोलताना जिल्हा न्यायाधीश संजयजी जाधव साहेबांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला व पोक्सो कायद्याबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर असे मार्गदर्शन केले. बाल वयातील लैंगिक अत्याचाराच्या वाढत्या घटना बद्दल काळजीही व्यक्त केली. तसेच विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना सविस्तर उत्तरे पण दिली. प्रादेशिक उपसंचालक तेजसजी माळवदकर सरांनी मनोगतामध्ये आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी सद्यस्थितीत राबविल्या जात असलेल्या व विद्यार्थी हिताच्या विविध योजनाबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी जाणून घेऊन विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे सुद्धा दिली. आगामी काळात आश्रमशाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढविन्यावरच अधिक भर असणार असल्याचे परखड मत पण व्यक्त केले. तसेच शाळा राबवीत असलेल्या विद्यार्थी हिताच्या अनेक योजना बद्दल व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबद्दल कौतुकही केले. उपविभागीय अधिकारी मंजुषाताई लटपटे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनी पालकांशी व शिक्षकांशी मनमोकळा संवाद ठेवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य निलेश राजेमाने यांनी तर सूत्रसंचालन प्रा.योगेश कदम व आभार देवानंद केंद्रे यांनी मानले. कार्यक्रमात प्रा.रामदास सोनाळे, प्रा.अमरीश निचळे, प्रा संगमेश्वर चिल्लरगे, प्रा बालाजी गगनबोणे, प्रा रणवीरकर जयवंत, प्रा सुमित पंडित, प्रा विद्या जाधव, राजकुमार मोरे, विशाखा जाधव, योगेश्र्वर जाधव, रघुनाथ पांचाळ, वैभव माने, सतीश शेळके, लक्ष्मीनारायण चंदिले, दिलीप शिंदे, अनुसया पोटे, गणेश वाकळे, संगमेश्वर कुसनुरे, प्रथमेश देशमुख, मुरलीधर मालू, महादेव बनसोडे, विजय गिरी, किशोर पवार, धनराज कांबळे, लक्ष्मण टोम्पे आदींनी सहकार्य केले.

## लातूर मनपा प्रभाग 3 मधील अतिवृष्टी ग्रस्तांना सरसकट शासकीय मदत मंजूर करण्याची मागणी

**लातूर : वार्ताहर**

लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ०३ मधील मागासलेला भाग असल्याने येथील रहिवाशांची घरे मजबूत नसल्याने पाऊसाचे पाणी घरात शिरते यातच सप्टेंबर महिन्यात ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्याने नागरिकांचे खूप मोठे नुकसान झाले आहे. घरात पाणी शिरल्याने सर्व संसार उपयोगी वस्तू आणि राशन पाण्यात भिजल्याने जीवन जगणे कठीण झाल्याने राष्ट्रवादी किसान सभेने माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांना निवेदन दिल्याने संजय बनसोडे यांनी तहसीलदारांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात यावे म्हणून पत्र देण्यात आले. राष्ट्रवादी किसान सभा अध्यक्ष राहुल बनसोडे यांच्या नेतृत्वात तहसीलदार सौदागर तांदळे यांची भेट घेऊन चर्चा करून त्यांना निवेदन देण्यात आले. मे महिन्यात सुरू झालेला पाऊस हा सप्टेंबर महिन्यात मोठ्या प्रमाणात वाढल्याने गेल्या काही दिवसापासून ढगफुटी सदृश्य अतिवृष्टी झाल्याने समस्त लातूर जिल्हा व शहरामध्ये विशेष करून पूर्व भागातील प्रभाग क्र. ३ मध्ये इंदिरानगर, साठेनगर, जय भीम नगर, राजीव नगर, संत गोरोबा सोसायटी, वैभव सोसायटी, यशवंत भैय्या नगर, आनंद नगर, महात्मा गांधी कुष्ठधाम वस्ती, बालाजी नगर, तुळजाभवानी नगर (भोई वाडा), करीम नगर, प्रबुध्द नगर, म्हसोबा नगर, पंचवटी नगर या संपूर्ण परिसरामध्ये पावसाचे पाणी घरात शिरून तसेच घरांचे छताला गळती लागून तर कोणाचे या पावसात पत्रे उडून गेल्याने किंवा पावसाचे पाणी गळत असल्याने संपूर्ण घरामध्ये पाणी च पाणी साचले असल्याने घरातील संसार उपयोगी साहित्य, राशन पाण्यात भिजल्याने, जेवण राहणे व झोपण्याची व्यवस्था अतिशय दयनीय झाली असून येथील नागरिकांना जीवन जगण्यासाठी कसरत करावी लागत आहे तसेच प्रभाग क्रमांक ०३ मधील जागा गायरान असल्याने येथील नागरिकांकडे कसल्याही प्रकारचा मालकी हक्क म्हणून कोणतेही कबाले, ८ - अ उतारे, मालकी हक्क उपलब्ध नसून यांना घरकुल अथवा कोणतेही शासकीय अनुदान घेता येत नसल्याने तसेच येथील नागरिक गेल्या २५ ते ३० वर्षापासून येथे कच्चे घर करून रहिवास करत असून यांनी प्रशासनाकडे अनेक वेळा दाद मागूनही त्यांना प्रशासनाने आज पर्यंत मालकी हक्क म्हणून कोणताही कागद दिला नसल्याने हे या भागातील खरे अतिवृष्टीग्रस्त असल्याने यांना आज घडीला प्रशासनाच्या मदतीची गरज भासत असल्याने येथील नागरिकांच्या बैठकीतून या भागातील राष्ट्रवादी किसान सभेचे अध्यक्ष राहुल बनसोडे यांच्याशी चर्चा करून यांच्याच नेतृत्वात माननीय आमदार संजय बनसोडे यांना निवेदन देण्यात आल्याने त्यांच्या निवेदनावरून आमदार संजय बनसोडे यांनी तहसीलदारांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी म्हणून पत्र काढून राष्ट्रवादी किसान सभेच्या वतीने प्रभाग क्रमांक ०३ मधील अतिवृष्टी ग्रस्तांना विनाअट सरसकट नुकसान भरपाई तात्काळ देण्यात यावी म्हणून लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन तहसीलदारांशी सविस्तर चर्चा करून निवेदन देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते मकरंद सावे, प्रशांत पाटील किसान सभेचे जिल्हा अध्यक्ष राहुल बनसोडे, संतोष उपाडे, प्रणिती सुर्यवंशी, प्रा. अमर वाघमारे, प्रविण थोरात, खमर काजी, राजकिरण सुर्यवंशी, जाहागीर शेख, दिनेश काबळे, कबीर शेख, हेमंत जाधव, सचिन मेटे, ज्ञानेश्र्वर पाटील, अविनाश राठोड, राजेश खटके, राहुल काबळे, रमाकांत कसबे, काशीनाथ गव्हाणेसह कार्यकर्ते उपस्थित होते.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

**पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग सुर्यानगर ता.डहाणू जि.पालघर**

**ई-मेल** - eepipcdgmail.com

**ई-निविदा सुचना क्र. ०१ सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग सुर्यानगर ता.डहाणू जि.पालघर (सुर्या प्रकल्प वसाहत मनोर ता. जि. पालघर), जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग सुर्यानगर ता.डहाणू जि. पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | जिल्हा | कामाची अंदाजित किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| १. | देहरजी मध्यम प्रकल्प ता. विक्रमगड, जि. पालघर प्रकल्पाच्या घळभरणीच्या अनुषंगाने Submergence Clearance करणे. | पालघर | रु. २५,३७,९२२/- |
| ई-निविदा उपलब्ध कालावधीः | दिनांक १७/१०/२०२५ (सकाळी १०.०० वाजता) ते दि. २४/१०/२०२४ (सायंकाळी ४.४५ वाजेपर्यंत) | | |
| ई-निविदा उघडणे : | दिनांक २७/१०/२०२५ (सकाळी ११.०० वाजता शक्य झाल्यास) | | |

**जा.क्र. पापाप्रबांवि/सुर्या/लेशा-२/२१४९/सन २०२५**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सुर्यानगर ता. डहाणू, जि.पालघर
दिनांक : ०८/१०/२०२५

**सही/-**
**(दि.श्री.शेवाळे)**
कार्यकारी अभियंता,
पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग,
सुर्यानगर, ता. डहाणू, जि.पालघर

**जिमाका/पालघर/जाहि ७२/३९९/२०२५ दिनांक : १०/१०/२०२५**

13 TO 19 OCTOBER 2025 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 10/11/2025 8:45 PM Page 1



# भीमसैनिक झोपलेत का?

या देशाची घटना लिहिणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आमचे आराध्य दैवत आहेत असे म्हणून बाबासाहेबांच्या नावावर दुकानदारी करणारे आणि स्वतःला भीमसैनिक किंवा दलित नेते म्हणून घेणारे बाबासाहेबांचे अनुयायी आज बाबा साहेबांच्या घटनेचा अपमान होताना गप्प कसे? कोण कुठला वकील राकेश किशोर आज उघडपणे म्हणतोय की मी संविधान मानीत नाही आणि संविधान मनाने कोट्यवधी लोक त्याची ही मुजोरी सहन करीत आहेत. कुठे गेले दलीत नेते? की दारू पिऊन कुठल्या तरी गटारात पडलेत. इतर वेळी त्यांना बाबासाहेबांच्या संविधानाची सतत आठवण होत असते. पण त्याच संविधानाचा आज मनुवाद्यांकडून अपमान होत असताना ते रस्त्यावर का नाही उतरत? हा देश ज्या संविधानावर चालतो त्या संविधानाचे रक्षण करण्याची तसेच संविधानाचा सन्मान राखण्याची जबाबदारी सरकारची आहे. पण ज्यांच्या पूर्वजांनी दलित आदिवासींचे शोषण केलं. ज्यांनी घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा वेळोवेळी अपमान केला त्यांचेच वंशज आज सत्तेत असल्याने त्यांना एक दलीत माणसाने लिहलेले संविधान कसे मान्य होईल? त्यांना जातीची उतरंड हवी. त्यांना मनुचे विचार संविधानात हवेत. ते गांधीना नव्हे तर गांधींची हत्या करणाऱ्या नथुराम गोडसेला मानतात. त्यांचा माणसातल्या देवापेक्षा दगडातल्या देवावर अधिक विश्वास आहे, असे प्रतिगामी लोक पुन्हा या देशात जातीपातीचे घाणेरडे समाजकारण आणू इच्छितात. त्याचाच एक भाग म्हणून त्यांना आरक्षण संपवायचे आहे. त्यासाठीच त्यांनी जाती जातीत भांडे लावायला सुरुवात केली आहे. आज प्रत्येक जातीचा माणूस आरक्षणासाठी रस्त्यावर उतरतोय. त्याला रस्त्यावर उतरायला भाग पडले जातेय. जेणेकरून जाती जातीच्या लोकांमध्ये दंगली व्हाव्यात आणि याच दंगलीचे निमित्त करून आरक्षण संपवायचे असा एक बामणी कावा आहे. राकेश किशोर याच्या तोंडून संविधानाचा अपमान करणाऱ्यांचे मायबाप नागपूरच्या संघाच्या मुख्यालयात बसलेत. वाटले होते १०० वर्षात संघामध्ये काही वैचारिक बदल होईल. पण १०० वर्षात फक्त खाकी पँटची साईज बदलली. हाप पँटीची फूल पँट झाली. या एकमेव बदला पलिकडे संघात कोणताही बदल झालेला नाही. उलट प्रतिगामी शक्ती वाढत आहेत. सरन्यायाधीश दलीत म्हणून त्यांच्यावर बूट फेकणारा वकील किशोर हे प्रतिगामी शक्ती वाढत असल्याचे एक उदाहरण आहे. त्यामुळे अशा लोकांना वेळीच आवरणे गरजेचे आहे. अन्यथा या देशात यादवी माजून देशाचे तुकडे पडतील. देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर सर्वोच्च न्यायालयात बुट भिरकावण्याचा घृणास्पद प्रयत्न झाला. गेल्या कित्येक वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात विकिली करणाऱ्या राकेश किशोर या वकिलानेच हे कृत्य केले. त्याच्या या या कृत्यानंतर संपूर्ण देशातून संताप व्यक्त करण्यात आला. सरन्यायाधीश पद हे अत्यंत मोठे आणि सन्माननीय आहे. असे असताना त्याने या पदावर बसलेल्या न्यायमूर्तीकडे बुट भिरकावण्याचा प्रयत्न केल्याने या वकिलावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे. दरम्यान, शरद पवार यांच्या पक्षाचे खासदार निलेश लंके यांनी यांनी या वकिलाची भेट घेऊन त्याला संविधानाची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र त्या वकिलाने केलेल्या विधानानंतर आता नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. निलेश लंके यांनी गांधीगिरी करत वकील राकेश किशोर याची भेट घेतली. लंके यांनी त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो आणि भारतीय संविधानाची प्रत भेट दिली. या कृत्यातून राकेश किशोर याला भारत देशातील संविधानाची जाणीव करून देण्याचा निलेश लंके यांचा प्रयत्न होता. किशोर याची भेट घेतल्यानंतर निलेश लंके यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. या संवादादरम्यान त्यांनी राकेश किशोर याने मला संविधान मान्य नसल्याची खळबळजनक माहिती दिली. देश जाती-धर्मावर चालतो, असेही वकील राकेश किशोर म्हणाल्याचे लंके यांनी सांगितले आहे. निलेश लंके यांनी गांधीगिरी करत वकील राकेश किशोर याची भेट घेतली. लंके यांनी त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो आणि भारतीय संविधानाची प्रत भेट दिली. या कृत्यातून राकेश किशोर याला भारत देशातील संविधानाची जाणीव करून देण्याचा निलेश लंके यांचा प्रयत्न होता. खुर्चीचा मान तुमच्याकडून राखला गेला पाहिजे होता असे त्यांना सांगितले त्यावर सरन्यायाधीशांनी भगवान विष्णू यांचा अवमान केला, असा दावा राकेश किशोर याने केल्याचे सांगितले. पण मग किशोरने देवाच्या दरबारात जाऊन वकिलीवकरेला हवी. संविधानाने निर्माण केलेल्या न्यायालयात काळा कोट घालून का पोट भरतोय? त्याचा देवावर इतका विश्वास असेल तर वकिली सोडून कुठल्यातरी मंदिरातील पुजारी बनायला हवे होते. अशा या धर्मांध लोकांना लोकशाहीत जागा नाही. या बिनडोक अंध भक्तांचा सोक्षमोक्ष लावायची वेळ आली आहे. सरन्यायाधीशपदाची खुर्ची ही देशाची होती. त्या खुर्चीला वेगळे महत्त्व आहे. तुम्ही रस्त्यावर विरोध करायला हवा होता. तुम्ही रस्त्यावर विरोध केला असता तर आम्ही तुमचे समर्थन केले असते, असे लंकेनी किशोर यांना सांगितले. सोबतच, देव-देवतांवर कोणी टीका करत असेल तर आपण रस्त्यावर विरोध करू. पण त्या खुर्चीचा मान तुमच्याकडून राखला गेला पाहिजे. दरम्यान सरन्यायाधीशांच्या दिशने बुट भिरकावण्याचा प्रयत्न केल्यानंतर राकेश किशोर याने प्रतिक्रिया दिली होती. मला कोणताही पश्चात्ताप नाही, असे यावेळी राकेश किशोर म्हणाला होता. राकेश किशोरच्या कृत्याचा मात्र त्याच्या कुटुंबाने निषेध केलेला आहे.मात्र या अशा गोष्टी घडतात कशा? या लोकांची संविधानाच्या विरोधात बोलण्याची हिंमत होतेच कशी? असा संतप्त सवाल लोक विचारीत आहे. पण त्याचे उत्तर लोकांच्या डोळ्यासमोर आहे. जेव्हापासून भारतात हिंदुत्ववादी मोदी सरकार आले तेंव्हापासून कट्टरपंथीय लोकांचा हैदोस सुरू झालाय. संविधान बदलण्याची भाषा केली जात होती. आणि आतातर सुप्रीम कोर्टातला एक वकील सांगतोय की मला संविधान मान्य नाही. ज्या संविधानाने याच्या अंगावर काळाकोट चढवला याला रोजी रोटी दिली ते संविधान मी मानीत नाही असे म्हणण्याची त्याची हिंमत कशी झाली .अशा वकिलाला सर्वोच्च न्यायालयासमोर जोड्यांनी मारायला हवे त्याची सनद रद्द करायला हवी. तरच अशा प्रवृत्तीन आळा बसेल. हे सर्व घडत असताना बाबासाहेबांच्या नावावर दुकानदारी करणारे गप्प का? बाबासाहेबांच्या उपकारापेक्षा त्यांना मनुवादी मोदींची चाकरी अधिक महत्वाची वाटतेय का? सर्वधर्म समभाव हीच या देशाची खरी ओळख आहे पण ती पुसून टाकण्याचा आणि मनूच्या धोरणानुसार पुन्हा या देशात चातुर्वर्णाची उतरंड निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. त्याला जर रोखले नाही तर पुन्हा या देशात उच्च वर्णियांची मनुवादी समाजव्यवस्था जोर धरू लागेल. शिक्षणाचा अधिकार फक्त ब्राह्मण लोकांचं राहील आणि दलीत ओबीसींना त्यांची गुलामी करावी लागेल. हे होऊ नये असे वाटत असेल तर किशोर सारख्या वकिलांना सर्वोच्च न्यायालयाच्या गेटवरच फटके द्यायला हवे आणि जो कुणी भविष्यात संविधानाच्या विरुद्ध बोलेल त्याला कायद्यानेवनाचे तर कायदा हातात घेऊन ठोकायला हवे असे आता लोक उघडपणे बोलत आहेत.

# आज गरज आहे जात मुक्त विचारांच्या लढ्याची...!

देशाच्या सर्वोच्च न्यायालयात जिथे न्याय समता आणि संविधान हे सर्वोच्च मानले जातात. तिथेच नुकतीच एक अत्यंत लज्जास्पद आणि धक्कादायक घटना घडली. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या बेंच जवळ एका वकिलाने बूट फिरकावत हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्याचे विधान होते सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही, पण मी विचारतो हा धर्म रक्षणाचा प्रयत्न होता की जाती अहंकाराचा उफाळा होता? कारण जर देशाच्या सर्वोच्च न्यायालयातील अनुसूचित जातीतील सरन्यायाधीश सुद्धा अशा अपमान जनक वर्तनाचा बळी ठरत असतील तर सामान्य जनतेच्या सुरक्षितेची आम्ही कोण देणार? ही घटना आपल्याला सांगते की जातीय व्यवस्था अजूनही या देशाच्या घरांधरामध्ये झिरपत आहे. हीच काही न्यायाधीश मंडळी म्हणतात आता अनुसूचित जाती जमातीसाठी आर्थिक निकषावर आरक्षण द्या. क्रिमीलेयर लागू करा पण मित्रांनो आज जो माणूस सर्वोच्च न्यायालयात बसलेला आहे त्याच्यावरही जर जात पाहून हल्ला होत असेल तर आर्थिक निकष सांगणाऱ्याने थोडा स्वपरिक्षण करायला हवे! हा प्रश्न प्रत्येक सजग नागरिकांनी स्वतःला विचारला पाहिजे ही घटना आपल्याला दाखवून देते की सविधान लिहिले गेले कायदे झाले पण मन अजून बदललेली नाहीत. जाती या मानसिकता अजूनही जिवंत आहे हीच मानसिकता सामाजिक न्यायावर प्रश्नचिन्ह निर्माण करते आणि म्हणून आजची गरज आहे जात मुक्त विचारांची मानवतेच्या मार्गाची आणि सामाजिक समतेच्या नव्या लढ्याची.

जात ही केवळ सामाजिक रचना नाही ती आजही मानसिकतेत जिवंत आहे आणि ती मानसिकता न्यायालयात बूट फेकते कार्यालयात अन्याय करते समाजात विभाजन करते क्रिमीलेयर एक सामाजिक फसवणूक आज सरकार क्रीमीलेयर लावुन अनुसूचित जाती जमातीचे हक्क मर्यादित करत आहे ते म्हणतात जे पुढे गेले त्यांना आरक्षणाची गरज नाही पण मी विचारतो जेव्हा सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीशावर सुद्धा जात पाहून हल्ला होतो तेव्हा आपण कोणाला पुढे गेलेले म्हणणार? जात अजूनही ओळख ठरवते आणि म्हणून म्हणूनच क्रिमीलेयर हा सामाजिक न्यायावरील एक मोठा अन्याय आहे. आरक्षण हे आर्थिक दुर्बुलतेसाठी नव्हे तर सामाजिक अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आहे हे विसरू नका आपण सरन्यायाधीशांचा सन्मान करतो पण समाजाने स्वतःलाच विचारायला हवे आज त्यांच्यावर बूट फेकला तो जात पाहून का आर्थिक निकष पाहून? देशाच्या सर्वोच्च न्यायालयात ही घटना घडल्यानंतर किंचितही न डगमगता न्यायमूर्ती भूषण गवई यांनी वकिलांना आपले काम सुरू ठेवा असे सांगितले आणि अशा प्रकाराला मी



घाबरणारा नाही असे दमदारपणे सांगितले त्या त्यांच्या शांत संयमी आणि दृढ भूमिकेचे आम्ही कौतुक करतो आणि या भ्याड प्रकाराचा तीव्र निषेध नोंदवतो घटना केवळ हल्ला नाही ही संविधानावरचा आघात आहे.

आज देशाच्या सर्वोच्च न्यायालयात घडलेली घटना ही केवळ एका व्यक्तीवरचा हल्ला नाही तर संपूर्ण संविधानिक मूल्यावरचा आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वावरचा थेट आघात आहे. सरन्यायाधीश भूषण गवई हे अनुसूचित जातीतील असून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित होऊन आपल्या कर्तुत्वाने सर्वोच्च पदावर पोहोचलेले आहेत. लक्षात घ्या की न्यायालयात आरक्षण नाही त्यांच्यावर एका वकिलाने बूट फेकत हल्ला करण्याचा प्रयत्न केला त्याचे कारण म्हणून सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही असे विधान करण्यात आले खरा मुद्दा धर्माचा नाही जातीय अहंकाराचा आहे. वास्तु हे आहे की भूषण गवई बौद्ध न्यायाधीश म्हणून काही अतिरेकी विचारांच्या लोकांना ते बघवत नाही त्यांनी एका खटल्यात विष्णू मूर्ती संदर्भात केलेल्या कायदेशीर ठिप्पणीचा जाती आणि धार्मिक पद्धतीने विपर्यास करून त्यांना जाणीवपूर्वक लक्ष केले गेले समाज माध्यमातुन निंदास्पद प्रचार केला गेला स्वतः न्यायालय किंवा सरकार कोणीही दखल घेतली नाही. परिणामी बूट भिरकवण्याची हिंमत झाली हे लक्षात घ्यावे आजचा बुट फेकण्याचा प्रकार म्हणजे त्या द्वेषपूर्ण मोहिमेचा परिपाक आहे. सर्वोच्च न्यायालयात हे न्याय समता आणि धर्मनिरपेक्षतेचे प्रतिक आहे. त्या न्यायालयात बसलेल्या सरन्यायाधीशावर धर्माच्या नावाखाली हल्ला होणे म्हणजे न्यायव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वावर प्रहार आहे. हा केवळ असंतोष नाही हा संविधान विरोधी आणि जातीय विचारांचा उघड प्रदर्शन आहे. सनातन धर्माचा अपमान हे केवळ एक बहाना आहे. खरा मुद्दा हा आहे की बौद्ध न्यायाधीशाने विष्णू मूर्ती विषयी भाष्य करण्याचे धाडस केले आमच्या अधिकार क्षेत्रात नाही म्हटले आणि त्यामुळे त्यांच्यावर जातीय मानसिकतेने संताप व्यक्त केला. अशा मानसिकतेने समाजाला न्याय समता आणि बंधुता या संविधानिक मूल्यापासून दूर नेले जाते. आम्ही या अमानवी असभ्य आणि संविधान विरोधी कृतीचा तीव्र निषेध करतो. सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीशावर अशा प्रकारे वर्तन करणे म्हणजे देशातील प्रत्येक बहुजन, आदिवासी, अल्पसंख्याक, समाजवादी सर्वजाती धर्माच्या पुरोगामी विचारावर हल्ला करणे होय. आम्ही स्पष्ट सांगतो धर्माच्या नावाखाली जातीय अहंकाराचा फैलाव हा देश अधिक सहन करणार नाही संविधानाचा अपमान करणाऱ्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. ही घटना पुन्हा दाखवून देते की जातीयवादी मानसिकता अजूनही जिवंत आहे ते उच्च शिक्षणात न्याय संस्थेत प्रशासनात आणि समाजाच्या मानसिकतेत खोलवर बसलेली आहे. सरन्यायाधीश भूषण गवई वरचा हल्ला म्हणजे केवळ एका न्यायमूर्तीवर हल्ला नाही तो महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर आणि संविधानावर हल्ला आहे. आज आपण सारे जागे होऊया जातीपाती बाहेर पडूया आपण संविधानावर विश्र्वास ठेवणारे आहोत न्याय आणि समता हीच आपली ओळख आहे . न्यायमूर्ती भूषण गवई सोबत उभे राहणे म्हणजे न्याय समता आणि संविधानासोबत उभे राहणे होय .आम्ही या घटनेचा ठाम स्पष्ट आणि एकमुखी निषेध नोंदवतो. जरी बुट फेकणाऱ्या कथित वकीलाची दिल्ली बार कौन्सिलने त्यांची विकली सनद तात्काळ निलंबित केली. त्याची प्रत सुप्रीम कोर्ट रजिस्टर कार्यालय सर्व उच्च न्यायालय जिल्हा न्यायालय आणि सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनला पाठविण्यात आली आसलीतरी अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्याअंतर्गत आणि भारतीय न्याय संहिता बी एन एस अंतर्गत कारवाई झाली पाहिजे अशी भूमिका संविधानवादी नागरिकांची आहे. वकिलाचे निलंबन उद्या कधीही मागे घेतले जाऊ शकते ही काही शिक्षा नाही निलंबन म्हणजे सनद रद्द करणे नव्हे!

हे लिहीत असताना टीव्ही वर्तणपत्रावर बातमी आली की या घटनेचा निषेध पंतप्रधान नरेंद्र मोदी , विरोधी पक्षनेते खर्गे, काँग्रेस नेत्या सोन्या गांधी आणि राहुल गांधी यांनी तसेच तामिळनाडू व केरळ राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सुद्धा निषेध केला. परंतु बुट फिरकवीला त्या राकेश किशोर वकिलाचा बूट त्याला परत करण्यात आला आणि कोणतीही फौजदारी कारवाई करण्यात आली नाही. सर्वोच्च न्यायालयात बूट फिरकविणाऱ्या बाबत अशी बोटचेपी भूमिका घेणे व त्याला सन्मानाने बूट परत देणे खेदजनक आहे. सामाजिक न्यायावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे म्हणून आजची गरज आहे जात मुक्त विचारांची, मानवतेच्या मार्गाची आणि सामाजिक समतेच्या नव्या लढ्याची.

**– प्राचार्य शंकर सोनवणे**

# मुंबई भूमिगत मेट्रो आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे भारताचा वेग आणि विकास अधोरेखित - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी




**नवी मुंबई : वार्ताहर**

आजचा दिवस केवळ प्रकल्पांच्या उद्घाटनाचा नव्हे, तर भारताच्या झपाट्याने होत असलेल्या परिवर्तनाचे आणि प्रगतीच्या दिशेने घेतलेल्या ठोस पावलांचे प्रतीक आहे. मुंबईतील विविध प्रकल्पांमुळे देशाचा वेग आणि विकास अधोरेखित झाला आहे. पायाभूत सुविधांतील गुंतवणूक, तरुणांसाठी रोजगार संधी हे विकसित भारताच्या दिशेने टाकलेले मजबूत पाऊल असल्याचे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन, मुंबई मेट्रो लाईन-३ च्या आचार्य अत्रे चौक ते कफ परेड या अंतिम टप्प्याचे राष्ट्राला अर्पण, मुंबई वन'या देशातील पहिल्या एकात्मिक कॉमन मोबिलिटी ॲपचा शुभारंभ तसेच राज्यातील ४१९ आयटीआय आणि १४१ तांत्रिक संस्थांमध्ये २ हजार ५०६ बॅचेसच्या माध्यमातून नवीन अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रमाचा शुभारंभ झाला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमास राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री किंजरापू राममोहन नायडू, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, जपानचे भारतातील राजदूत ओनू केईची, वन मंत्री गणेश नाईक, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, लोकसभा सदस्य श्रीरंग बारणे, खासदार सुनील तटकरे, खासदार नरेश म्हस्के, खासदार धैर्यशील पाटील, आमदार सर्वश्री रवींद्र चव्हाण, अमित साटम, प्रशांत ठाकूर, महेश बालदी, विक्रांत पाटील, मंदाताई म्हात्रे, अदानी ग्रुपचे चेअरमन गौतम अदानी यांच्यासह लोकप्रतिनिधी व विविध मान्यवर उपस्थित होते.

मराठीतून भाषणाची सुरूवात करून प्रधानमंत्री मोदी यांनी नागरिकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्राचे पुत्र, लोकनेते दि. बा. पाटील यांनी समाजासाठी, शेतकऱ्यांसाठी ज्या सेवाभावी वृत्तीने काम केले ते सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे जीवन समाजसेवेचे काम करणाऱ्यांना नेहमीच प्रेरणा देत राहील, असा दि. बा. पाटील यांचा गौरवपूर्ण उल्लेख प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले की, मुंबई शहराला आज एक ऐतिहासिक भेट मिळाली आहे. देशातील सर्वात गजबजलेल्या शहरांपैकी एक असलेल्या मुंबईला पूर्णतः भूमिगत मेट्रो सेवा मिळाली आहे. या मेट्रो प्रकल्पामुळे, शहरातील लाखो प्रवाशांचा प्रवास आता अधिक सोयीस्कर, जलद आणि सुरक्षित होणार आहे. मुंबईच्या हृदयात भूमिगत मेट्रो सेवा सुरू करणे हे एक अभूतपूर्व यश मानले जात आहे. ही मेट्रो सेवा केवळ मुंबईच्या विकासाचे प्रतीक नाही, तर ती आधुनिक भारताच्या गतिशीलतेचे देखील प्रतीक आहे. मुंबईतील प्रवास आता दोन-अडीच तासांऐवजी ३०-४० मिनिटांत पूर्ण होईल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा देश आणि राज्यासाठी महत्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे नवी मुंबईच्या विकासाला अधिक चालना मिळणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे डिझाईन कमळाच्या आकारात असून ते भारतीय संस्कृती आणि समृद्धीचे प्रतीक आहे. या विमानतळामुळे महाराष्ट्रातील शेतकरी, लघुउद्योग व निर्यातदार थेट युरोप, मध्यपूर्व यांच्यासह जागतिक बाजारपेठेशी जोडले जातील. त्याचा थेट फायदा स्थानिक अर्थव्यवस्थेला आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीला होणार आहे. राज्यातील फळे, भाजीपाला व मासे निर्यातीला युरोप व इतर देशात नवीन बाजारपेठ मिळेल. यामुळे नवीन गुंतवणूक आणि उद्योग वाढेल. २०१४ मध्ये देशात केवळ ७४ विमानतळ होते. आज ही संख्या १६० च्या पुढे गेली आहे. उडान योजनेंतर्गत लाखो सामान्य नागरिकांनी प्रथमच विमान प्रवासाचा अनुभव घेतला आहे. भारत आता जगातील तिसरा सर्वात मोठा देशांतर्गत विमान वाहतूक करणारा देश बनला आहे. विमान उत्पादक कंपन्यांकडे सध्या एक हजारहून अधिक नव्या विमानांच्या निर्मितीची मागणी आहे. त्यामुळे पायलट्स, इंजिनीअर्स, केबिन क्रू आणि देखभाल, दुरुस्ती व तपासणी (एमआरओ) सुविधांमुळे हजारो रोजगार संधी उपलब्ध होणार असून 'भारत हा एमआरओ' हब होणार आहे. त्याचबरोबर ७६ हजार कोटींच्या वाढवण बंदरामुळे रोजगार वाढणार असल्याचेही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

पीएम सेतू योजनेद्वारे देशभरातील आयटीआय संस्थांना उद्योग क्षेत्राशी जोडले जात आहे. ७ हजार कोटी रुपयांच्या या योजनेंतर्गत ड्रोन, रोबोटिक्स, ग्रीन हायड्रोजन, इलेक्ट्रिक वाहनांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जात आहे. महाराष्ट्र सरकारने देखील राज्यातील शेकडो आयटीआय व तांत्रिक शाळांमध्ये अत्याधुनिक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केले आहेत. यामुळे लाखो तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत, असेही नरेंद्र मोदी यांनी नमूद केले.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहेच, त्याचबरोबर सर्वाधिक व्हायब्रंट शहरापैकी हे एक शहर आहे. मुंबईतील वाहतुकीला गती देण्याचे काम होत आहे. देश एक राष्ट्र, एक मोबिलिटी' कडे जात असून त्या दृष्टीकोनातून मुंबई वन' ॲप सुरू करण्यात आले आहे. प्रवाशांना एकाच तिकीटाद्वारे लोकल, मेट्रो, बसचा वापर करता येणार आहे. त्यामुळे मुंबईकरांना तिकिटासाठी रांगेत उभे राहावे लागणार नाही. मुंबईकरांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचणार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

वस्तू व सेवा करामधील बदलानंतर झालेल्या नवरात्रीतील विक्रमी खरेदीचा उल्लेख करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले की, देशात टीव्ही, बाईक, रेफ्रिजरेटरची विक्रमी विक्री होत आहे. देशातील बाजारपेठ बळकट होत आहे. आपण सर्वांनी स्वदेशी'चा स्वीकार करणे गरजेचे आहे. देशाच्या पैशाचा उपयोग देशातील कामगारांना, उद्योगांना आणि तरुणांना लाभदायक ठरेल. त्यामुळे देशवासियांनी स्वदेशीचा अंगीकार करून भारताच्या विकास प्रवासात सहभागी होण्याचे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केले. देशाच्या विकासाला गती देण्यास महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिला आहे. महाराष्ट्राने विकासात आघाडी घेतली आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक गाव, शहर आणि तरुण अधिक सक्षम बनवण्याचे उद्दिष्ट आहे, असेही नरेंद्र मोदी यांनी यावेळी सांगितले. संपूर्ण देश विकसित भारताच्या संकल्पनेला जोडला जात आहे. लोकहित सर्वोपरी हे लक्षात ठेवून सर्व शासकीय योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहेत. देशाच्या कानाकोपऱ्यात विकासाचा वेग वाढत असून देशाची प्रगती लक्षात येत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे नवी मुंबई विमानतळाची प्रतिकृती देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **अॅड.रूपेश शिंदे**. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

13 TO 19 OCTOBER 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 10/11/2025 8:45 PM Page 1



# भिवंडी शहारात अवैध्य उपचार प्रसूती करणाऱ्या चार दायी महिलांवर कारवाई

**भिवंडी : वार्ताहर**



भिवंडी शहरात झोपडपट्टी विभागात मोठ्या प्रमाणावर बोगस झोला छाप डॉक्टर दुकान थाटून उपचार करीत आहेत. त्याविरोधात आयुक्त अनमोल सागर यांनी कठोर कारवाईचे निर्देश दिल्यानंतर वैद्यकीय आरोग्य विभागाचे डॉ संदीप गाडेकर व नियंत्रण प्रमुख डॉ जयवंत धुळे यांच्या नेतृत्वा खालील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मागील दोन महिन्यात चार बोगस डॉक्टरांवर कारवाई केल्या नंतर आता आपला मोर्चा अवैध प्रसूती व उपचार करणाऱ्या दायीं कडे आपला मोर्चा वळवला आहे. शहरात अनधिकृतपणे प्रसूती उपचार करणाऱ्या चार दायी महिलांवर पालिका वैद्यकीय विभागाने कारवाई करीत गुन्हे दाखल केले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार शांतीनगर परिसरातील गायत्रीनगर, फातिमा नगर, आझाद नगर या झोपडपट्टी भागात अवैध महिला कोणत्याही वैद्यकीय परवाना शिवाय प्रसूती व उपचार करीत असल्याची माहिती मिळाल्यावर बुधवार (९) रोजी रात्रीच्या सुमारास मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ संदिप गाडेकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.जयवंत धुळे, डॉ.प्रिया फडके, डॉ. राजकुमार शर्मा, डॉ.अक्सा अन्सारी व वैद्यकीय विभागातील कर्मचारी यांनी पंच व शांतीनगर पोलिसांनी गायत्रीनगर चिस्तिया मस्जिद परिसरात सलमा बानो जैनूल शेख (४०), गायत्रीनगर पोलिस चौकी जवळ नीलम रतन चौरसिया (३९), आझादनगर येथील कादरीया मस्जिद परिसरात नुसरत बानो सुफियान अहमद खान (४६), तर फातमा नगर येथे निसाद बानो मुमताज अहमद अन्सारी (४४) या महिला स्वतः जवळ कोणताही वैद्यकीय परवाना नसताना अवैध पणे प्रसूती व महिलांवर उपचार करताना आढळून आल्याने या चार ही महिलांना ताब्यात घेत त्यांच्या ताब्यातून ३८ हजार ७६४ रुपयांची ऑलियोपॅथीची औषधे, उपकरणे आढळून आले आहेत. या महिलां विरोधात शांतीनगर पोलिस ठाण्यात डॉ. मोहम्मद शोएब अन्सारी यांनी दिलेल्या तक्रारी वरून महाराष्ट्र प्रॅक्टीशनर ॲक्टचे कलम ३३, ३६ व भारतीय न्याय सहिता कलम ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या चार ही महिलांना नोटीस देण्यात आली असून त्यांच्या विरोधात लवकरच दोषारोपपत्र सादर केले जाईल अशी माहिती शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी दिली आहे. शहरात बोगस डॉक्टरांसोबत अप्रशिक्षित दायी यांच्या कडून सर्रासपणे प्रसूती केल्या जात असल्याच्या तक्रारी वाढीस लागल्या आहेत. ज्यामुळे माता बाल रुग्णांच्या आरोग्याच्या तक्रारी वाढीस लागल्या आहेत. त्यांना आळा बसावा यासाठी वैद्यकीय पथक नियमित कारवाई सुरू ठेवेल असे सांगत, नागरिकांनी सुद्धा अधिकृत वैद्यकीय प्रमाणपत्र असणाऱ्या डॉक्टरांकडे उपचार करून घ्यावेत असे आवाहन आयुक्त अनमोल सागर यांनी केले आहे.

# पोलिसांनी फटाक्यांचे गोडाऊन केली सील

**उल्हासनगर : वार्ताहर**



दिवाळीच्या पार्श्वभूमीवर उल्हासनगरच्या अनेक रहिवाशी भागांमध्ये फटाक्यांची अनधिकृत गोदाम सुरू आहेत, विनापरवाना कोणत्याही सुरक्षेविना रहिवासी भागांमध्ये फटाक्यांची ही मोठ मोठी गोदाम आणि दुकान बिनधास्तपणे सुरू आहेत. शैलेश कोळी सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे कडून मिळालेल्या माहिती नुसार, या गोदामांमध्ये मोठ्या प्रमाणात स्फोटक फटाक्यांचा साठा करण्यात आला असून यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे, याच अनुषंगाने उल्हासनगर कॅम्प नंबर ४ च्या आर.जी. एस. स्कुलच्या बाजूला आणि कॅम्प २ च्या मोनिका हॉल शेजारील दोन मोठ्या फटाक्यांच्या अनधिकृत गोदामांवर पोलिसांनी छापा मारलाय, या दोन्ही गोदामातील जवळपास दोन तीन लाखापर्यंतच्या स्फोटक फटाक्यांचा बेकायदा साठा पोलिसांनी आढळून आल्याने त्यांनी तो सिल केलाय,याप्रकरणी निकेश छाब्रिया आणि उमेश वधेरिया या दोन्हीही गोदाम चालकांवर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. उल्हासनगर शहरात फक्त २७ परवानाधारक फटाक्यांची दुकानातून असतांना शहरात शेकडोंच्या संख्येने तेही रहिवासी भागात सर्रासपणे बेकायदेशीर फटाक्यांची विक्री केली जाते आहे,विशेष म्हणजे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर या फटाक्यांच्या साठा करण्यासाठी मोठ-मोठी गोदाम या विक्रेत्यांकडून घेऊन ठेवण्यात आली असून त्या ठिकाणी करोडोंच्या फटाक्यांचा साठा करण्यात आला आहे. दरम्यान यावर मोठी कारवाई झाली नाही तर उल्हासनगर शहरात एखादी मोठी दुर्घटना होऊन मोठ्या प्रमाणात जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची अशा अनधिकृत स्फोटक फटाक्यांचा साठा करणाऱ्या दुकानदारांवर आणि गोदामांवर विशेष लक्ष असणार आहे.

# लातूर शिवसेनेचे सुनिल बसपुरे व बालाजी जाधव यांचा सत्कार

**लातूर : वार्ताहर**

महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आणलेली शहरी भागातील बांधकाम परवान्याची एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीची अर्थात 'यूडीसीपीआर'ची अंमलबजावणी करण्यासाठी अभ्यासपूर्ण व सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्याबद्दल इंजिनियर असोसिएशन लातूर (एसीईए)च्या वतीने अध्यक्ष डॉ अभिजीत देशपांडे सरसंबेकर यांनी लातूर उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव व लातूर महानगरप्रमुख सुनिल बसपुरे यांचा गुरुवारी सत्कार केला. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे राज्याचे मुख्यमंत्री असताना ३ डिसेंबर २०२० रोजी महानगरपालिकेत सर्व बांधकाम क्षेत्रातील ही नियमावली लागू केली होती. पण गेली पाच वर्षांपासून लातूर महानगरपालिकेमध्ये ही नियमावली लागू करण्यात आली नव्हती. याची दखल लातूर शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, महानगरप्रमुख सुनिल बसपुरे यांनी अभ्यासपूर्ण पाठपुरावा करून मंजूर करून घेतली. त्यामुळे सर्वसामान्य लातूरकरांना बांधकाम परवान्यासाठी सुलभता येणार आहे. त्याबद्दल इंजिनियर असोसिएशन लातूरच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी असोसिएशनचे पदाधिकारी विलास ढोणे, रिजवान गडीवाले, अरशद पटेल, असलम शेख, अभिजीत कदम, तय्यब सय्यद, शिवलिंग लद्दे, आसिफ शेख, संतोष नाशिकर. विनोद उदगीरकर, अहमद मुल्ला, वसीम शेख, मनोज देशमुख, संदीप उचेकर, वामन पाटील, ऋषिकेश निगडीकर, विठ्ठल भोसले, दिनेश सरवडीकर, अमोल सेलुकर व शिवसैनिक राजू कतारे आदी उपस्थित होते.

# बँक स्तरावर १०० टक्के वसुली दिलेल्या वि.का.संस्थांचा सत्कार

**देवणी : वार्ताहर**




लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक वसुली हंगाम २०२४-२५ मधील बँक स्तरावर १०० टक्के वसुली दिलेल्या विविध कार्यकारी सेवा संस्थांचा सत्कार समारंभ दि.१७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून देवणी तालुका मुख्यालय सभागृहात आयोजित करण्यात आला होता. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकचे संचालक भगवानराव रामचंद्रराव पाटील तळेगावकर हे उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीत बँकेचे संचालक दिलीप पाटील नागराळकर, क्षेत्रीय अधिकारी राम जाधव, शंकरराव पाटील तळेगावकर, व्यंकटराव पाटील वलांडीकर, जवळगा सरपंच विजयकुमार पाटील हे उपस्थित होते.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.मुख्यालय आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभा सन २०२४-२५ अखेरीस ४२वी वार्षिक सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालय लातूर येथे २४ सप्टेंबर २०२५ रोजी असून तालुका स्तरावर सर्व चेअरमन, गटसचिव यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात बँक स्तरावर दि ३० जुन २०२५ अखेर १०० टक्के वसुली दिलेल्या चेअरमन व गटसचिव यांचा सत्कार मान्यवराच्या हस्ते करण्यात आला. देवणी तालुका बँक स्तरावर ६५ कोटी १५ लाख ६० हजार वसुली पैकी ५८ कोटी ८२ लाख ८ हजार ईतकी वसुली करून ९०.२८ टक्के वसुली करून देवणी तालुका जिल्ह्यात तीसऱ्या क्रमांक मीळवत सतत दुसऱ्यांदा तीसरा क्रमांक मीळविला असल्याने बँकेच्या वतीने संचालक भगवानराव पाटील तळेगावकर व दिलीप पाटील नागराळकर यांच्यासह तालुक्यातील चेअरमन व गटसचिव यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी तालुक्यातील चेअरमन सदस्य शेषराव पाटील, संजय पाटील,गुणवंत धनेगावे, शिवाजीराव पाटील,पांडुरंग पटवारी, राजकुमार हसनाबादे, शहाजी सावंत, संगाप्पा चरपल्ले महेश पाटील, वैजनाथ मिर्चे, संजीव भोसले, अंकुश बागवाले, अविनाश पाटील, बालाजी कारभारी, विजयकुमार लुले, विलास कदम, जे.डी.बिरादार, सुर्यकांत चिंचोळे, शीतल बिरादार, पांडुरंग चामले, व्यंकटराव पाटील, शंकर हुडे, पद्मीनबाई म्हेत्रे, व्यंकटराव जाधव, दत्तात्रय पाटील आदीसह सर्व गटसचिव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर बिरादार यानी केले तर आभार अमजद शेख यानी मानले.

# मुले बनणार उद्योजक, अनुभूती विद्या निकेतनमध्ये दिवाळी मेळा २०२५ उपक्रम

**जळगाव : वार्ताहर**

अनुभूती विद्या निकेतन आणि अनुभूती बाल निकेतनद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले जातात. आता दिवाळीच्या सुट्यांपूर्वी 'दिवाळी मेळा २०२५' या अनोख्या उपक्रमाचे आयोजन १२ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. अनुभूती उद्यमिता कार्यक्रमाच्या अंतर्गत हा उपक्रम घेण्यात येणार आहे. यावेळी अशोक जैन, अनिल जैन, अजित जैन, अतुल जैन आणि जैन कुटुंबियांची उपस्थिती असणार आहे. दिवाळी मेळा २०२५' कार्यक्रम रविवार, १२ ऑक्टोबर २०२५ रोजी संध्याकाळी ४:०० ते ७:०० वाजेपर्यंत आयोजित केला जाईल. मेळ्यात मॉन्टेसरी आणि इयत्ता १ चे विद्यार्थी स्वतः तयार केलेले खाद्य पदार्थ, कला आणि हस्तकला उत्पादने दिवाळी मेळात आणणार आहे. विद्यार्थी ही खाद्य पदार्थ आणि उत्पादने व्यवस्थापन आणि पालकांच्या मदतीने करणार आहे.

### मुलांना काय होणार फायदा?

मुलांना विविध कौशल्य आत्मसात करता यावे? या उद्देशाने या दिवाळी मेळाचे आयोजन केले आहे. यामुळे मुलांना योजना बनवणे, पॅकेजिंग करणे, विक्री करणे, ग्राहकांशी संवाद साधणे यासारख्या व्यावहारिक गोष्टी शिकता येणार आहेत. प्रत्येक स्टॉलसाठी स्वतःचा ब्रँड नाव आणि लोगो असणार आहे. जे मुलांनीच तयार केलेले असणार आहे. या उपक्रमामुळे मुलांमध्ये वित्तीय साक्षरता, सर्जनशीलता आणि उद्यमशील विचारसरणीला विकसित होण्यास मदत मिळणार आहे. हा कार्यक्रम मुलांमध्ये सहकार्य, जबाबदारी आणि आत्मविश्वास वाढवणार आहे.

# भिवंडीत अतिधोकादायक इमारतीवर पालिकेची कारवाई



**भिवंडी: वार्ताहर**

भिवंडी शहरात अतिधोकादायक इमारतींची समस्या गंभीर असून पावसाळ्यात होणाऱ्या इमारत दुर्घटन टाळण्यासाठी आयुक्त अनमोल सागर यांनी शहरातील अतिधोकादायक इमारतींवर कारवाईचे निर्देश दिल्याने प्रभाग समिती क्रमांक एक अतंर्गत मालमत्ता क्रमांक १४९२ या अतिधोकादायक इमारतीवर कारवाई सुरू केली आहे. महापालिका प्रभाग समिती क्रमांक एक अंतर्गत येणारी ही इमारत अतिधोकादायक क्षेणीत आहे. या इमारती मध्ये इमारत मालक व फ्लॅट्स मालक यांच्यात वाद न्यायप्रविष्ट असल्याने मागील दोन वर्षापासून कारवाई प्रलंबित होती. न्यायालयीन अडथळे दूर करीत प्रभाग समिती क्रमांक एक चे सहाय्यक आयुक्त मकसूद शेख यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पोलिस प्रशासनाच्या मदतीने या इमारती मधील फ्लॅट्स मालक व भाडेकरू यांना घर बाहेर काढून इमारत निष्कासन कारवाई सुरू केली आहे. काही भाडेकरू काही दिवसांपूर्वीच इमारती मध्ये राहण्यास आल्याने त्यांनी केलेल्या विनंतीवरून तीन दिवसांची मुदत देण्यात आली असून त्यानंतर संपूर्ण इमारत तोडली जाणार आहे. दरम्यान रिकामा झालेला भाग पालिका पथकाने तोडण्यास सुरवात केली आहे अशी माहिती सहाय्यक आयुक्त मकसूद शेख यांनी दिली आहे.

# पालघर जिल्ह्यात दिव्यांगांप्रती संवेदनशीलता जागृती एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**पालघर : वार्ताहर**

राज्य शासन व केंद्र शासनाच्या सर्व कार्यालयांतील वर्ग १ व वर्ग २ अधिकाऱ्यांसाठी दिव्यांगांप्रती संवेदनशीलता जागृती या विषयावर जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शासनाच्या निर्देशानुसार ही कार्यशाळा दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजी पालघर येथे पार पडणार आहे. ही कार्यशाळा लोकशाहीर आत्माराम पाटील सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृह, पालघर येथे सकाळी ९.३० ते सायं. ५.०० या वेळेत घेण्यात येणार असून, जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड (भा. प्र. से.) यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित केला गेला आहे. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांतील वर्ग १ व वर्ग २ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. कार्यशाळेचा उद्देश दिव्यांग बांधवांविषयी अधिक संवेदनशीलता, समज आणि जबाबदारी निर्माण करणे हा आहे. असे दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी डॉ.प्रकाश हसनाळकर यांनी सांगितले आहे. या संदर्भातील आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे (भा.प्र.से.) यांनी जारी केले असून, सर्व संबंधित अधिकाऱ्यांना कार्यशाळेत उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# हरवलेले मोबाईल कोनगाव पोलिसांनी मालकांना केले परत



**भिवंडी : वार्ताहर**

नागरिकांचे हरवलेले मोबाईल फोन परत मिळवण्यासाठी कोनगाव पोलिसांनी विशेष कारवाई केली.पोलिसांच्या तत्परतेमुळे सुमारे ५.६ लाखांहून अधिक किंमतीचे २५ हरवलेले मोबाईल फोन नागरिकांना यशस्वीरित्या परत मिळाले आहेत. जे नागरिकांच्या मालमत्तेच्या रक्षणासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.

सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर (सीइआयआर) पोर्टलच्या मदतीने पोलिस कर्मचाऱ्यांनी पंधरा दिवसात केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे परिणाम आहेत. आयएमईआय क्रमांकांद्वारे हरवलेल्या आणि चोरीला गेलेल्या मोबाईल फोनचा मागोवा घेण्यास सक्षम करणारी सीईआयआर प्रणाली, कोनगाव पोलीस पथकांनी अनेक ठिकाणांहून डिव्हाइस शोधण्यासाठी आणि परत मिळविण्यासाठी प्रभावीपणे वापरली. पोलीस उपनिरीक्षक गायकवाड व महिला पो. शिपाई घनदाट यांच्या पथकाने ही कौतुकास्पद कामगिरी केली.पोलिस ठाण्यांमध्ये लोकांनी हरवलेल्या तक्रारीच्या आधारे जप्त केलेले मोबाईल फोन त्यांच्या मालकांना परत करण्यात आले आहेत.

# ठाणे-घोडबंदर मार्गावर चार दिवस जड-अवजड वाहनांना बंदी; चार महिन्यांत तिसऱ्यांदा दुरुस्ती

**मिरा-भाईंदर : वार्ताहर**



ठाणे-घोडबंदर मार्गाचे डांबरीकरण करण्यासाठी ११ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर या कालावधीत जड आणि अवजड वाहनांना बंदी घालण्यात आल्याचे आदेश मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून जारी करण्यात आले आहेत. गेल्या चार महिन्यांत या रस्त्याची तिसऱ्यांदा दुरुस्ती केली जात असल्यामुळे प्रवाशांकडून संताप व्यक्त केला जात आहे. ठाण्याच्या घोडबंदर मार्गावरील गायमुख ते वर्सोवा चौक पर्यंत(फाउंटन हॉटेल) सुमारे साडेचार किलोमीटर लांबीचा रस्ता ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडून मिरा-भाईंदर महापालिकेला हस्तांतरित करण्यात आला आहे. त्यामुळे या रस्त्याची देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी महापालिकेवर आहे. दरम्यान, या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने आणि रस्त्याची दुरवस्था झाल्याच्या तक्रारी वारंवार प्रवाशांकडून करण्यात येत होत्या. त्यामुळे हा रस्ता व्यवस्थित करण्यासाठी महापालिकेकडून डांबरीकरणाचा निर्णय घेण्यात आला आहे. या कामासाठी ११ ऑक्टोबर रात्री दहा वाजल्यापासून ते १४ ऑक्टोबर रात्री बारा वाजेपर्यंत या मार्गावरून जड-अवजड वाहनांना बंदी राहणार आहे. या संदर्भातील अधिसूचना शुक्रवारी पोलीस आयुक्तालयाकडून जारी करण्यात आली आहे. दरम्यान, या काळात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून पर्यायी मार्गांचा अवलंब करण्याचे निर्देश पोलिसांनी दिले आहेत. ठाणे-घोडबंदर मार्गावर खड्ड्यांची समस्या कायम आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी महापालिकेने या मार्गाचे डांबरीकरण केले होते. मात्र, काही दिवसांतच पुन्हा खड्डे निर्माण झाले. त्यामुळे ऑगस्ट महिन्यात प्रशासनाने पुन्हा रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवून दुरुस्ती केली. त्यानंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्याचा पुन्हा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला. परिणामी आता पुन्हा या रस्त्याचे डांबरीकरण सुरू करण्यात आले असून प्रवाशांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान शिरसाट फाटाहून गणेशपुरी आणि चिंचोटी-खरबाव मार्गे प्रवास करता येईल. गुजरातहून येणाऱ्या वाहनांना मनोर-वाडा नाका मार्गे पर्यायी मार्ग वापरण्याचे आवाहन करण्यात आले असून ठाण्याहून घोडबंदरच्या दिशेला जाणाऱ्या वाहनांना वाय जंक्शनहून सरळ नाशिक रोडने मानकोली मार्गे जाण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# लातूर जिल्हा 'जुक्टा'ची देवणी तालुका कार्यकारिणी जाहीर



**देवणी : वार्ताहर**

लातूर जिल्हा जुक्टाच्या बैठकीत ठरल्यानुसार देवणी तालुका जुक्टाची आढावा बैठक विवेकवर्धिनी कनिष्ठ महाविद्यालय, देवणी येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीत संघटनेच्या तालुक्यातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. जुक्टा संघटनेचे मार्गदर्शक प्रा. शिवाजी शिंदे यांच्या अध्यतेखाली व राज्य महासंघाचे उपाध्यक्ष तथा जुक्टाचे लातूर जिल्हाध्यक्ष प्रा. शिवराम सूर्यवंशी, कार्यालयीन सचिव प्रा. राजेंद्र नागरगोजे, रेणापूर तालुका माजी सचिव प्रा. लहुकांत शेवाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांबाबत चर्चा होऊन त्याचे निरकरण करण्यासाठी एकसंघ राहुन लढा चालू ठेवण्याचे व सर्वांना न्याय मिळून देण्यासाठी संघटना कटिबध्द असल्याचे प्रा. शिवराम सुर्यवंशी यांनी सांगितले तर संघटनेत खूप मोठी शक्ती असून ती अधिक बळकट करण्याचे आवाहन प्रा. शिवाजी शिंदे यांनी केले. यावेळी माजी प्राचार्य गोपिनाथ सगर, लोकजागृती शिक्षण संस्था वलांडीचे संचालक बाबुराव इंगोले, प्राचार्य नंदकिशोर पटवारी, उपप्राचार्य तथा देवणी तालुका जुक्टाचे विद्यमान अध्यक्ष बस्वराज पाटील, मुख्याध्यापक आर. के. बिरादार, स्वीकृत सदस्य प्रा. संतोष उपासे, क्रिडा प्रतिनिधी प्रा. दत्तात्रय कांबळे यांच्यासह तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत देवणी तालुका जुक्टा संघटनेची नुतन कार्यकारीणी पुढील प्रमाणे लोकशाही पद्धतीने निवडण्यात आली. प्रा. सुधीर नाबदे (तालुकाध्यक्ष), प्रा. रणजीत हुडे (उपाध्यक्ष), प्रा. रामदास मलवाडे (सचिव), प्रा. विजय नळेगांवकर (सहसचिव), प्रा. शिवाजी बिरादार (कोषाध्यक्ष), प्रा. भगिरथ सगर (जिल्हा प्रतिनिधी), प्रा. क्रांती पाटील (महिला प्रतिनिधी) उपस्थितांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या सूत्रसंचलन प्रा. सुमंत बिरादार यांनी केले तर आभार प्रा. रणजीत हुडे यांनी मानले.

13 TO 19 OCTOBER 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 10/11/2025 8:46 PM Page 1



पान १ वरून....

## भारताच्या सरन्यायधिशांवर 'बुट' फेरणारे...

होते असे त्याने सांगितले. ही घटना कोर्ट नंबर १ मध्ये सुनावणी दरम्यान सकाळी ११.३५ च्या सुमारास घडली. राकेश किशोर यांनी आपल्या पायातला बूट काढला मुख्य न्यायाधीशांच्या दिशेने फेकण्याचा प्रयत्न केला. सुरक्षारक्षकांनी वेळीच त्यांना अडवलं आणि बाहेर घेऊन गेले. न्यायालयाच्या अधिकाऱ्यांनी सरन्यायाधीशांकडे कारवाईसाठी आदेशाची मागणी केली. त्यावर गवई यांनी या घटनेकडे दुर्लक्ष करण्यास सांगितलं. राकेश किशोर यांना वॉर्निंग देऊन सोडून द्या असं सांगितलं. राकेश किशोर यांच्याकडे अधिकृत प्रवेश कार्ड होतं असं पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं. यात बार काउंसिल ऑफ इंडियाच कार्ड आणि सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनच्या अस्थायी सदस्यतेचा समावेश होता. एवढे सगळे घडूनही राकेश किशोरच्या विरोधात सरकारने कारवाई केली नाही. पंतप्रधान मोदींनी केवळ गवई यांना फोन करून या घटनेबद्दल देशातील प्रत्येक नागरिक दुःखी असल्याचे सांगून वरवरची सहानुभूती दाखवली, पण एवढा मोठा दलीत समाज गप्प कसा बसला? त्याच बरोबर देशातील सगळ्याच पक्षांमध्ये आंबेडकरी विचारांचे आणि त्यांच्या धर्माचे लोक आहेत. आज त्यांना जे काही मिळाले ते डॉ. बाबासाहेबांमुळेच मिळाले, असे असताना ते गप्प कसे? जर हाच प्रकार एखाद्या देवा धर्माच्या बाबतीत घडला असता तर सगळेच हिंदुत्ववादी पेटून उठले असते. पण आज डॉ. बाबासाहेबांना आपले दैवत मानणारे लोक त्यांच्या संविधानाचा अपमान होऊनही गप्प बसले. हा त्यांच्या हतबलतेचा पुरावाच म्हणावा लागेल. जर असले प्रकार सहन केले जाऊ लागले तर राकेश किशोर सारख्या मनुवाद्यांना अधिक बळ मिळेल आणि सरकार हिंदुत्ववाद्यांचे असल्याने सरकारचा त्यांना पाठिंबा असेल. मग या देशातील दलीत, मुस्लिम आणि इतर धर्मियांचे काय होणार याचीच आता चिंता निर्माण झाली आहे.

## अनैतिक संबंधात अडथला ठरला...

पण हा माणूस आपल्या अनैतिक संबंधात अडथला ठरतोय असे तिला वाटू लागले त्यामुळे प्रियकराच्या मदतीने तिने त्याचा काटा काढला या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

धामणगाव रेल्वे नजीकच्या नारगावंडी येथील शुभम गजानन वारंगणे (२३) याचा नातेवाईक महिलेच्या अनैतिक संबंधात अडथळा ठरल्याने खून करण्यात आल्याचा उलगडा दत्तापूर पोलिसांनी केला. त्याचा मृतदेह मंगळवारी सायंकाळी यवतमाळ मार्गावर आढळला होता. तासाभरात पोलिसांनी महिलेसह चौघांना याप्रकरणी अटक केली. समृद्धी दत्तापूर पोलिसांनी महामार्गालगत गोदामाजवळ असलेल्या घटनास्थळी पंचनामा केला व तात्पुरता मर्ग दाखल करून तपासाला प्रारंभ केला. यावेळी नातेवाईक महिलेने घटनास्थळ वेगळेच सांगितल्याने ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या मार्गदर्शनात पोलिसांनी तिच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. त्यामुळे धैर्य गमावलेल्या महिलेने शुभम हा अनैतिक संबंधात अडथळा ठरत असल्याने त्याच्या खुनाचा कट रचल्याचे कबूल केले. पोलिसांनी गोपनीय माहिती व तांत्रिक पुराव्यांच्या आधारांवर मनोज कीर्तने (रा. जुना दत्तापूर), अमोल सुरेश अर्जुने (रा. जुना दत्तापूर) व अशोक ऊर्फ चिवडा व्यंकटराव चवरे (६५, रा. नारगावंडी) यांच्यासह महिलेला शुभमच्या खूनप्रकरणी अटक केली. दरम्यान, दत्तापूर पोलिसांनी तासाभरात चौघांना ताब्यात घेतले. त्यांनी गुन्हा कबूल केला. मृताच्या मामाच्या फिर्यादीवरून खुनाचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली. पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलिस अधिकारी अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार गिरीश ताथोड,सहायक निरीक्षक गजानन गजभारे, उपनिरीक्षक पुंडलिक चव्हाण, जमादार अतुल पाटील, हरिहर वैद्य, दीपक पंधरे, सागर कदम, नवनाथ खेडकर, नाईक पवन हजारे, कॉन्स्टेबल किरण पवार, नीलिमा खडसे, मयूर ढवक, चालक पीयुष चौबे यांनी ही कारवाई केली. सूत्रांनुसार, मनोज कीर्तने व ती महिला यांच्यात अनैतिक संबंध होते. त्याला शुभमचा विरोध असल्याने दोघांनी त्याचा काटा काढण्याचे ठरविले. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी मनोजने अमोल व अशोक यांच्या मदतीने शुभमला दुचाकीवर बसवून आसेगाव शिवारात समृद्धी महामार्गाला लागून असलेल्या गोदामाजवळील शेतातील पडीत जागेवर नेले. तेथे हात व पाय दोरीने करकचून बांधून शरीरावर दांडक्यांनी प्रहार केला. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या शुभमचा जागीच मृत्यू झाला.

## तृतीयपंथीवर जडले होते पतीचे प्रेम...

हातोड्याने वार करुन हत्या केल्याची घटना समोर आली आहे. भादोले-कोरेगाव रस्त्यावर भादोले गावच्या हद्दीत ही घटना घडलीये. रोहिणी प्रशांत पाटील (वय २८) असं हत्या झालेल्या पत्नीचं नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी रोहिणीचा पती प्रशांत पाटील याला ताब्यात घेतलंय. तृतीयपंथीयासोबत असलेल्या अनैतिक संबंधामुळे पती प्रशांत पाटील याने भादोले- कोरेगाव रस्त्यावर पत्नी रोहिणी पाटील हिची कोयत्याने आणि हातोडीने वार करून हत्या केली आहे. दरम्यान, त्यापूर्वी प्रशांतने पत्नीच्या डोळ्यात चटणी देखील टाकली होती. ही घटना घटना सोमवारी (दि. २९) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी वडगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आलाय. पती प्रशांत हा मध्यरात्री कोल्हापूरच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेत हजर झाला. तर रात्री नातेवाईकाने पती प्रशांत बरोबर या हत्या प्रकरणा आणखी काहीजण सामील असल्याची शक्यता वर्तवली आहे. शिवाय, नातेवाईकांनी या प्रकरणी कारवाई करण्याची मागणी देखील केली आहे. दरम्यान, प्रशांत पाटील याला न्यायालयात हजर केले असता, त्याला तीन ऑक्टोंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्हा हातकणंगले तालुक्यातील भादोले इथल्या प्रशांत पाटील हा पत्नी रोहिणी, दोन मुली, आई, वडील याच्यासमवेत राहत होता. प्रशांत याचे एका तृतीयपंथीया सोबत चार, पाच वर्षापासून अनैतिक संबंध होते. याची माहिती मिळाल्यापासून पत्नी रोहिणी आणि पती प्रशांत यांच्यात वाद सुरु होता. रोहिणीचं माहेर सांगली जिल्ह्यातील ढवळी येथे होतं. तिचे वडील आजारी असल्यान दवाखान्यात उपचार सुरु होते. त्यामुळे गेल्या आठवडा भरापासून ते दोघेजण ये-जा करत होते. सोमवारी रात्री ढवळी इथून पती-पत्नी दोघे भादोलेला येण्यासाठी मोटारसायकलने निघाले होते. दरम्यान, रात्री नऊ वाजता कोरेगाव-भादोले रस्त्यावर आले असता पती प्रशांत याने पत्नी रोहिणी हिच्या डोळ्यात चटणी टाकली. त्यानंतर त्याने पत्नीचा गळ्यावर, डोक्यावर, चेहऱ्यावर कोयता आणि हातोडीने हल्ला करून तिला संपवलं. पत्नीचा खून केल्यानंतर प्रशांतने गावातील लोकांना पत्नीचा खून केल्याचे सांगून मुलींकडे लक्ष ठेवा. मी आता पाच-सहा महिने येणार नाही, असे सांगून फरार झाला. या घटनेने भादोले गावात एकच खळबळ उडाली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रमोद शिंदे व अन्य पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

## संशयामुळेच सुखी संसाराची वाताहात ...

टाकून आपल्या माहेरी जात होती. ती एकदा का माहेरी गेली की लवकर आसाळवाडा येथे परत येत नव्हती.अनिता हिच्या आई वडिलांनी ही बंडूला समजावून सांगून तु अनितावर संशय घेऊ नकोस. आमची मुलगी तसली नाही, तुला कुठे उघडया डोळ्यांनी तिचे लफडे दिसले असले तर आम्हाला सांग, आम्ही तिला आमच्या हातानी विहिरीत ढकलून देतो परंतु दारू पिऊन विनाकारण मारहाण करीत जावू नकोस असे सांगितले होते. अनिता ही घरात काही काम न करता दिवसभर तिच्या मोबाईलवर कोणाशी तरी बोलत असते त्यामुळे त्याच्या डोक्यात तिच्या चारित्र्याचा संशय घोळत होता. त्याला ती तरी काय करणार होती. तिने ही नवरा म्हणून त्याला बऱ्याच वेळेला विश्वासात घेऊन सांगितले होते की, तुमच्या डोक्यातील खुळ काढून टाका.माझे बाहेर कोणाबरोबर कसले ही संबंध नाहीत तरी ही त्याच्या डोक्यात एकदा बसलेले संशयाचे भूत काही केल्या उतरत नव्हते. तो दारू पिऊन घरात आला की, नवरा बायकोची भांडणे या कारणातून ठरलेली होती. त्याच्या मनातून काही केल्या संशय जात नव्हता. त्याचे कामावर लक्ष कमी पण बायकोवर जास्त होते. कुठे ती कोणाबरोबर सापडते का? याची चाचपणी तो करीत होता. तशी संधी ही त्याला एकदा मिळाली.घरात कुणी नसताना दुपारच्या सुमारास अनिता आणि वस्तीवरील भावकीतील एक तरूण बेडवर बोलत एकमेका शेजारी बसलेले असल्याचे त्याला दिसले तो लागलीच सुतावरून स्वर्ग गाठत त्याने आपल्या बायकोचे भावकीतील तरूणाबरोबर संबंध असल्याचा जावाई शोध लावला. त्यावेळी ही झालेल्या भांडणात अनिताने त्याला उगीच माझ्यावर संशय घेऊ नका असे सांगितले. परंतु आता ती त्या तरूणाबरोबर बोलत असताना त्याने पाहिले असल्याने तो आपले तेच खरे करीत होता. खरे तर अनिता ही आपला संसार भला, आपली मुले भली म्हणून शेतीतील कामाबरोबर जनावरांची उसाभर ही करीत होती पण त्याचे बंडूला काही नव्हते. तो भलता सलता विचार करीत अनिताला रोज मारहाण करीत होता. तसा त्याचा स्वभाव हा रागीट आणि चिडखोर होता. तो भांडणात काठीला साप साप म्हणून बडवित होता. त्याच्या संशयाला काही अर्थ नव्हता. अनिताने त्याला किती ही जरी समजावून सांगितले तर त्याला काही फरक पडत नव्हता. उलट आपल्या माघारी अनिता ही त्या तरूणाबरोबर झोपून मजा मारत असते असे नको ते विचार त्याच्या डोक्यात येत होते. रोजच्या भांडणाला आणि त्याच्या मारहाणीला ती ही कंटाळलेली होती परंतु आपल्या दोन लहान मुलांच्याकडे बघून ती कसा बसा आपल्या संसाराचा राहट गाडा ओढत होती. हल्ली ती ही भांडणात नवऱ्याला नको नको ते उलटे बोलत होती कधी कधी तर ती त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवत असल्याने तो तिच्यावर चिडत होता. शेतातील घरात त्याचे आई वडिल आणि मुले झोपत होते तर अनिता आणि तो जनावरासाठी बांधलेल्या गोठयातील घरात झोपत होते. नवरा बायकोसाठी वेगळी खोली असल्याने त्याच्यात सुरू झालेली भांडणे पहाटे पर्यत चालत होती. तो शिवीगाळ करून संशय घेऊन मारहाण करीत असल्याने ती ही रागाने त्याला आपल्या जवळ घेत नव्हती. त्यामुळे त्याचा संशय जास्तच बळावत होता. तो दारूच्या आहरी जास्त गेला होता. आपली बायकोच बरोबर नाही साला आपल्या जिंदगानीत काय राहिले नाही म्हणून तो निराश झाला होता. त्यातच गावात आणि आसाळवाडा वस्तीवर अनिता आणि त्या तरूणाच्या संबंधाची चर्चा होत होती. खरे तर या चर्चेला तोच कारणीभुत होता. वस्तीवरील लोकांत त्यानेच अनिता आणि त्या तरूणात तसले संबंध असल्याची चर्चा त्यानेच पसरवली होती. उलट तोच खरे तर आपल्या बायकोला बदनाम करीत होता. संशयाने त्याचे मन पोखरलेले होते. कधी एकदा हिला मारून टाकतो आणि आपल्या मागची ब्याद संपवितो असे त्याला झाले होते. त्याची भांडणे खरे तर विकोपला गेलेली होती. मंगळवार दि.७ ऑक्टोंबर २०२५ रोजी दिवसभर अनिता शेताची आणि जनावरांची कामे करून थकली होती. रात्रीचा स्वयंपाक करून सगळयाची जेवण खाण करून ती गोठयातील खोलीत झोपायला आली. घरात सासु सासरे आणि त्याची मुले झोपली होती. रात्री बंडू हा दारूच्या नशेतच घरात आला होता.तो जेवण न करताच गोठयातील खोलीत आला.दारूच्या नशेत त्याने अनिता हिच्या बरोबर भांडण काढत तु माझ्या बरोबर कशाला झोपतेस जा त्याच्या बरोबर झोप जा. तुझा यार तुझी बाट बघतोय असे तो तिला म्हणाला. यातून त्याची भांडणे सुरू झाली.ती ही त्याच्या तोंडाला तोंड देत उत्तरे देत होती. जवळपास रात्री १२ पर्यत त्याची भांडणे सुरूच होती. भांडणात त्याने तिला जबर मारहाण ही केली. तो तिला शिव्या देत असताना ती ही त्याला शिव्या देत तु माझा नवरा कसला त्यापेक्षा तु मेलेला बरा असे तिने रागाच्या भरात त्याला म्हटले. याचा राग त्याला आला. मी माझ्या याराकडे जाते तु बस येथे सोटा हलवित असे ती त्याला रागाने म्हणाली, त्याच्या मर्दानगीवर तिने बोट ठेवले. त्याच्या रागाचा पारा चढला. त्याने बाजुलाच पडलेला हातोडा घेतला आणि दोन तीन वेळा रागाने अनिताच्या डोक्यात जोरात हाणला. तसे ती ओरडत खाली पडली. तिच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्साव सुरू झाला. ती रक्ताच्या थारोळ्यात खाली पडली. तिचे डोके फुटले. त्यात जागीच तिचा मृत्यु झाला. आपल्या हातून तिचा खून झाला आहे हे त्याच्या लक्षात आले. तो घाबरला आपल्या हातून काय घडले याचा तो विचार करू लागला. त्याच्या डोक्यात ही नाना विचार येवू लागले.आता आपल्याला पोलीस पकडतील आणि मारहाण करतील याची त्याला भिती वाटू लागली. आता आपण तरी जगून काय करायचे आपल्या मागे आपल्या मुलाबाळांचे काय होईल ते होईल असे म्हणून त्याने बाहेर लावलेल्या ट्रॅक्टरचा रबरी पट्टा आणला. त्याचा गळफास तयार करून तो आपल्या गळ्यात अडकवून त्याने गळफास घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी नवरा बायको लवकर उठून बाहेर येईनात म्हणून बंडूच्या आईने गोठयातील घरात जावून आत पाहिले तर सुन अनिता ही रक्ताच्या थारोळयात पडलेली दिसली. तिच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्त गेलेले दिसत होते तर बाजुलाच मुलगा बंडू याने ही ट्रॅक्टरच्या रबरी पट्टयाने गळफास घेतल्याचे तिने बघून मोठयाने आरडा ओरडा करीत बाहेर आली. काही तरी विपरीत घडले असल्याचे आसाळवाडा वस्तीवरील लोकांनी ओळखले. त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी बघ्यांची गर्दी वाढली. नातेवाईकांनी अक्रोश चालविला होता. या घटनेची माहिती पोलीस पाटील संतोष खडतरे यांना समजताच त्यांनी ही तातडीने घटनास्थळी येवून पाहणी करून या घटनेची माहिती त्यांनी म्हसवड पोलीसांना दिली. म्हसवड पोलीस ठाण्याचे सपोनि अक्षय सोनवणे यांना या घटनेची माहिती समजताच त्यांनी घटनास्थळी आपल्या सहकार्यासह धाव घेतली. म्हसवड पोलीसांनी घटनास्थळाचा आणि दोन्ही मृतदेहाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनसाठी माण येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिले. या घटनेची माहिती म्हसवड पोलीसानी मयत अनिता हिच्या माहेरच्या लोकांना दिल्याने ते ही आसाळवाडा येथे दाखल झाले. मयत अनिता हिच्या नातेवाईकांनी म्हसवड पोलीसांत तक्रार दाखल केली. त्यानुसार अनिता हिच्या खून प्रकरणी तिचा मयत नवरा बंडु अंकुश घुटुकडे (वय ३६) याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास म्हसवड पोलीस करीत आहेत. संसाराच संशयाने वादळ निर्माण झाले की संसाराचे छप्पर कसे कोसळून पडते आणि एका संशयाने भरला संसार कसा उद्ध्वस्त होतो हेच या घटनेवरून दिसून येते.

## संशयामुळे लव्ह स्टोरीची शोकांतिका...

हे सगळं पाहिलं. त्यावेळी, वेटरने याबद्दल तातडीने हॉटेलच्या मालकाला माहिती दिली. त्यानंतर, पोलिसांना याबाबत कळवण्यात आलं. काही काळानंतर, संपूर्ण शहरात ही बातमी पसरली आणि लोक मोठ्या संख्येने हॉटेलच्या बाहेर गोळा झाले. रुतुजा (२१) आणि साहिल राजपूत (२३) अशी प्रकरणातील मृतांची नावे समोर आली आहेत. दोघेही बुलढाणा जिल्ह्यातील साखर खेरडा गावाचे रहिवासी असल्याची माहिती आहे. खरंतर, रुतुजा ही खामगाव पॉलिटेक्निकल कॉलेजमध्ये 'कंप्यूटर सायन्स'ची विद्यार्थीनी असून ती मागील दोन वर्षापासून साहिलसोबत प्रेमसंबंधात होती. दोघे नेहमी याच हॉटेलमध्ये भेटायचे, तसेच मागील वर्षभरात ते दोघे जवळपास ८ वेळा याच हॉटेलमध्ये भेटण्यासाठी आले होते.

प्राथमिक माहितीनुसार, साहिलला आपल्या प्रेयसीच्या चारित्र्यावर संशय होता. याच कारणावरून, हॉटेलच्या खोलीत दोघांमध्ये मोठं भांडण झालं. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, साहिलने आधीच हत्येचं प्लॅनिंग बनवलं असून तो आपल्या प्रेयसीला भेटण्यासाठी येताना धारदार शस्त्र घेऊन आला होता. सुरूवातीला दोघांमध्ये वाद झाला आणि हा वाद टोकाला पोहचला. रागाच्या भरात साहिलने त्याची प्रेयसी रुतुजावर हल्ला केला आणि त्यात रुतुजाचा मृत्यू झाल्याचं सांगितलं जात आहे. त्यानंतर, आरोपी प्रियकराने स्वत: वर हल्ला करून आत्महत्या केली. संबंधित घटनेची माहिती मिळताच पोलीस अधिकारी निलेश तांबे घटनास्थळी पोहचले आणि तिथला तपास केला. पोलिसांनी हॉटेलच्या खोल्या सील केल्या असून मृतदेह ताब्यात घेऊन ते पोस्टमॉर्टमसाठी पाठवण्यात आल्याची माहिती आहे. तसेच, हॉटेलच्या बाहेर पार्किंग मध्ये असलेली साहिलची बाईक सुद्धा जप्त करण्यात आली आहे. या घटनेमुळे आसपासच्या परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांच्या मते, प्रकरणाचा गांभीर्याने तपास केला असून पुरावे गोळा करण्यासाठी फॉरेन्सिक टीमकडून सुद्धा मदत घेतली जात आहे.

## काळ्या जादुटोण्यामुळेच दिराचे डोके...

वाड वडिलार्जीत शेत जमीनीवरून वाद ही होत होता. तसे पाहिले तर दोघांची पोटे ही हातावरची होती. परंतु दोघांत ईर्ष्या मात्र कमालीची होती. दोघांना ही एकमेकांची प्रगती पाहवत नव्हती. दोघे ही एकमेकांच्या कामात एकमेकाला आडकाठी घालत होते. त्यातच धोंडू वरक हे जरा देवर्षी आणि भोंदु मांत्रिकांच्या नादी लागलेले होते. ते आपली कोणतीही समस्या ही भोंदु बाबाकडे घेऊन जात होते. धोंडु हे भोंदू बाबा कडे जावून आपल्यावर आपल्या कुटूंबार करणी बाधा करीत असल्याचे सोनुची बायको भाग्यश्रीच्या लक्षात आल्यावर ती ही दुसऱ्या एका भोंदु बाबाकडे आपली समस्या घेऊन जावू लागली. तो भोंदु बाबा सांगेल तसे उपाय करणी धरणी ती करू लागली. तिचा विश्वास त्या भोंदु बाबावर बसल्याने दर आमावस्येला ती काही ना काही करणी करून दीर धोंडू याच्या घरासमोर रात्रीच्या वेळी ठेवू लागली. धोंडू याच्या घरासमोर लिंबु बाहुल्या टाचण्या असे अघोरी सामान प्रत्येक आमवस्येला रात्रीच्या वेळी पडत होते. दुसऱ्या दिवशी धोंडू आणि त्याच्या पत्नीला ही बाब लक्षात आल्यावर ते दोघे ही भाग्यश्रीच्या नावाने हात आणि बोटे मोडत तिच्याबरोबर भांडायला जात होते. प्रत्येक आमवस्ये पौर्णिमेला दोन्ही कुटूंबात भांडणे ही ठरलेलीच होती. आपली भावजेय आपल्यावर आपल्या कुटूंबावर करणी बाधा करीत आहे हे धोंडू वरक यांनी ओळखले. ते ही आपल्या भोंदु बाबाकडे जावून भाग्यश्री आणि भाऊ सोनु याचेवर उलटा करणी बाधाचा प्रयोग करीत होते. यातून दोन्ही कुटूंबे भोंदु बाबाच्या नादी लागून ते सांगेल तसा प्रकार करीत असल्याने दोन्ही कुटूंबाची अधोगती होऊ लागली होती. आमशेत कोलेमळा परिसरात दोन्ही कुटूंबातील भांडणाची चर्चा रंगत होती. बाहेरचे लोक याबाबत उलट सुलट बोलत होते. धोंडू वरक यांचा स्वभाव हा भांडखोर आणि रागीट होता भांडणात ते भावेजय भाग्यश्रीला हातात सापडेल त्या वस्तुने मारहाण करायला जात होते. एकदा दोनदा त्यांनी तिला मारहाण ही केली. दारू पिऊन आले की ते तिच्या घरासमोर उभे राहून कन्नडमध्ये नको नको तसल्या घाण घाण शिव्या ही देत होते. तरी ही दोन्ही कडून करणी बाधाचा प्रकार काही थांबत नव्हता. उलट दिवसे दिवस त्यात वाढच होत होती. एकमेकांच्या घरासमोर लिंबु, काळा दोरा, टाचण्या बाहुल्या त्यावर हळद कुंकू, गुलाल लावलेल्या अवस्थेत पडलेल्या असायच्या. बघणाऱ्याच्या छातीत हा प्रकार बघून धस्स होत होते. हा करणी बाधाचा प्रकार वाढलेला बघून धोंडू वरक याची सटकत होती. आता यावर कायमचा काही तरी उपाय काढायला पाहिजे असे विचार त्याच्या डोक्यात येत होते. भावजेय भाग्यश्री ही सांगून ही काही ऐकत नव्हती. उलट ती असला प्रकार जाणीवपुर्वक जास्तच करीत होती. धोंडू वरक यांनी तिला गावातील पंचामार्फत ही समज दिला. त्यावेळी तात्पुरती त्याची भांडणे मिटली होती, परंतु आमावस्या पौर्णिमा आली की परत दोन्ही कुटूंबातून असा अघोरी प्रकार घडत होता. याला दोन्ही कुटूंबे जबाबदार होती. धोंडू वरक ही असा प्रकार करू लागल्याने त्याच्या भांडणाला अंत राहिला नाही. त्यामुळे त्याची भांडणे वाढीस लागली होती. ती काही केल्या मिटत नव्हती.अलिकडे ती कामावर बाहेर जात असल्याने दिवसभर ती घरात नसायची. ती कामावरून उशिरा घरी परत आली की दीर धोंडू याच्या मनात तिच्या विषयी शंकेची पाल चुकचुकायची. कामावर जातो म्हणून ती कुठल्या तरी भोंदु बाबाकडे जावून आपल्या विरोधात कट कारस्थान करीत करणी बाधा करीत असते असे त्यांना वाटत होते. तसा विश्वास त्यांना होता. त्याच्या मनाची पक्की खात्री झाली होती की, भाग्यश्री ही कामाच्या निमित्याने बाहेर जावून करणी बाधा करीत आहे त्यामुळे तिला आता कायमचा धडा शिकवायचा असा त्यांनी विचार केला. मागील काही दिवसापूर्वी म्हणजे गुरूवार ११ सप्टेंबर २०२५ रोजी भाग्यश्री ही कामावर जायला घरातून बाहेर पडली. त्याच वेळी तिच्यासमोर धोंडू उभा राहिला. दीराला पाहून ती न पाहिल्या सारखे करीत कामावर जावू लागली. त्यावेळी धोंडू याने तिला अडविण्याचा प्रयत्न केला.तो तिच्याशी करणी बाधेच्या संशयातून वाद घालत होता.ती त्याचे काही न ऐकता पुढे जावू लागली. याचा राग धोंडू वरक याला आला. जवळच पडलेले फावडे त्याने घेतले. आणि कामावर जाणाऱ्या भाग्यश्रीच्या डोक्यात मागून तीन चार वेळा त्या फावडयाने जबर वार केले. त्यासरशी भाग्यश्रीच्या डोक्याला मोठी जखम झाली.तिच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. ती ओरडतच घरासमोरील अंगणात पडली. सकाळी सकाळी वरक कुंटूंबात काही तरी विपरीत घडल्याचे शेजाऱ्यांच्या लक्षात आले. त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात भाग्यश्री ही उताणी पडलेली होती. तिचा जागीच मृत्यु झाला होता. या घटनेची माहिती गावातील लोकांना समजताच त्यांनी घटनास्थळी गर्दी केली. या घटनेनंतर धोंडू वरक हा घटनास्थळावरून पळून गेला. कुणी तरी या घटनेची माहिती रामनगर पोलीसांना दिली. सकाळी सकाळी खूनाची माहिती मिळताच रामनगर पोलीसांनी घटनास्थळ गाठले. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळी पोलीसांनी फॉरेनिक्स टीमला पाचारण केले. घटनास्थळी कारवार जिल्हा पोलीस प्रमुख दीपन एम.एन आणि दांडेलीचे डीएसपी दयानद पवार तसेच रामनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक महांतेश नाईक यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. त्यांनी रामनगर पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. पंचनामा केल्यानंतर पोलीसांनी मृतदेह उतरीय तपासणीसाठी दांडेली येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळावर पडलेला रक्ताने माखलेला फावडा पोलीसांनी जप्त केला. या घटनेनंतर घटनास्थळावरून संशयीत धोंडू वरक हा पळून गेला होता. घटना घडून सहा सात दिवस झाले तरी त्याचा शोध लागत नव्हता. गोपनीय माहितीद्वारे पोलीसांनी त्याचा शोध घेऊन त्याला या घटनेनंतर १२ दिवसांनी ताब्यात घेतले. त्याला रामनगर पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती रामनगर पोलीसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने या घटनेची फिर्याद मयत भाग्यश्री हिचा नवरा सोनु वरक याच्याकडून पोलीसांनी घेतली.सोनू वरक याने दिलेल्या फिर्यादीनुसार पोलीसानी भाग्यश्री सोनु वरक (वय ३५) रा.आमशेत कोलेमाळ शिंगरगाव हिच्या खून प्रकरणी तिचा दीर धोंडू गंगाराम वरक (वय ५५) रा.आमशेत कोलेमाळ शिंगरगाव याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. त्याला पोलीसांनी कोर्टासमोर उभे केले असता कोर्टाने त्याची रवानगी कारवार जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी धोंडू वरक याच्याकडून गुन्हयात वापरलेला फावडा जप्त केला. या घटनेचा पुढील तपास रामनगर पोलीस करीत आहेत. आजही अनेक जण करणी बाधा याचेवर विश्वास ठेवून एकमेकाच्या विरोधात नको तो प्रकार करीत असल्याने सख्या नात्यात ही कटुता निर्माण होते. त्यातूनच मग संशयातून खूनाची घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

पान ८ वरून....

## सरन्यायाधीशांवर बूटफेक प्रकरणाच्या ...

स्थानी बसल्याचे या लोकांना मान्य नसल्याचेच दिसून येत आहे. या घटनेचा आम्ही निषेध करतो. राजाभाऊ चव्हाण यांनी, भविष्यात असे कृत्य घडू नये, न्यायालयाचे सार्वभौमत्व अखंडित रहावे, यासाठी राकेश किशोर याच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल करून त्याला तिहार जेलच्या अंडासेलमध्ये टाकावे, अशी मागणी केली. या आंदोलनात भदंत शिलकिर्ती, संजय मं. गो, जगदीश खैरालिया, उन्मेश बागवे, भैय्यासाहेब इंदिसे, जितेंद्रकुमार इंदिसे, संदीप खांबे, सुखदेव उबाळे, प्रल्हाद मगरे, कैलास हावळे, प्रमोद इंगळे, नंदकुमार मोरे, विमल सातपुते, सुमन इंगळे, तात्याराव झेंडे, प्रभाकर जाधव, बबन केदारे, श्रीकांत कांबळे, अशोक कांबळे, विशाल ढेंगळे, राम म्हसके, बाबा भदर्गे, हनुमान लांडगे, संजय दळवी, पंढरीनाथ गायकवाड, जालिंदर यादव, ॲड. अवचर, संजय गांगुर्डे, देविदास घोरपडे, ॲड. एंगडे, आशा शरणागत, ॲड. गौरेश इंदिसे, मिलींद सातदिवे, किशोर बनकर, नाना मगदूम, भीमराव शिरसाठ हे उपस्थित होते.

## मूल्यसंस्कार, गर्भसंस्कार, शिशु संस्कार...

कारगिल केंद, नारंगी केंद्र, फुलपाडा केंद्र, कांदिवली केंद्र, अंधेरी केंद्र, पालघर केंद्र, बोईसर, सफाला केंद्र या केंद्रांच्या प्रतिनिधींनी कार्यशाळेला सहभागी होते. एक्सपर्ट स्कूल केंद्र विरार (पश्चिम) या केंद्राने कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन उत्तम रित्या केले होते. मूल्यसंस्कार विभागात कार्य करण्यास उत्सुक असलेल्या १५ प्रतिनिधींनी आपल्या नावांची नोंद केली त्यांना श्री स्वामी समर्थ गुरुपीठाच्या प्रतिनिधींनी या विभागाची सखोल माहिती दिली. पालघर बालसंस्कार कोरटीमची नियुक्ती करण्यात आली. श्रीमती पल्लवी जाधव, शितल पवार, गणेश घोले, श्रध्दा गावडे, हेमंत मोरे, सौ. देशमुख ताई. डॉ. कविता शेट्टी (मुख्याध्यापिका), ट्रस्टी व एक्सपर्ट इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज विरार (पश्चिम) यांचे बहुमूल्य असे सहकार्य लाभले असे आयोजक कळवितात.

## दीपक मच्याडो यांच्या कथासंग्रहास...

दीपक (ज्युलिअस) मच्याडो हे नाबार्ड मधून उप-महाव्यवस्थापक ह्या पदावरून निवृत्त झाले असून आपल्या कार्यकाळात ते नाबार्ड परिवार ह्या गृहपत्रिकेचे सहसंपादक होते. निवृत्ती नंतर त्यांनी बॅसीन कॅथॉलिक बँकेच्या व्यवस्थापकीय मंडळाचे पहिले अध्यक्ष आणि तदनंतर संचालक मंडळावर तज्ञ संचालक म्हणून धुरा वाहिली आहे. स्थानिक दैनिके, मासिके, दिवाळी आणि नाताळ अंक यात त्यांचे लघुकथा, विनोदी, ललितगद्य, वैचारिक, प्रवासवर्णनपर लेखन सातत्याने प्रसिद्ध होत असते. वाडीतल्या वाटा या मुंबई विद्यापीठाच्या द्वितीय वर्ष कला शाखेच्या बोलीभाषा अभ्यासक्रमासाठी विहित करण्यात आलेल्या साहित्यामध्ये नटनटी आल्यात पालीया फेस्त्यात या त्यांच्या विनोदी लेखाचा समावेश आहे. वसईत नाट्यकलाकार आणि हास्य कलाकार म्हणूनही त्यांचा लौकिक आहे.

## १ लाख २0 हजार वृक्षांची लागवड

लातूर : लातूर शहर महानगरपालिकेच्या पुढाकाराने एक विद्यार्थी एक वृक्ष हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमासाठी सामाजिक वनीकरण विभाग व वन विभाग लातूर यांच्यामार्फत मोफत वृक्ष वाटप करण्यात येत आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून लातूर शहरातील एकुण ३५० शाळेमधील प्रत्येक विद्यार्थ्यांना एक वृक्ष असे जवळपास १,२०,००० वृक्ष वाटप करण्यात येणार आहेत. दरम्यान लातूर शहरातील श्री श्री रविशंकर विदयामंदीर या शाळेमध्ये मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या हस्ते विदयार्थ्यांना वृक्ष वाटप करून या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

# आश्रमशाळेतील दोन विद्यार्थ्यांची गळफास घेऊन आत्महत्या







**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील आंबिस्ते खुर्द येथील अनुदानित असलेल्या माध्यमिक आश्रम शाळेतील ९वी व १०वीच्या वर्गात शिकणाऱ्या दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांनी गळफास घेवून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठी घबराट तर परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना बुधवार ०८ ऑक्टोबर २०२५ रात्री १२:३० ते १ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. दोन्ही विद्यार्थ्यांचे मृतदेह शाळेच्या परिसरातील एका झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आले आहेत मोखाडा तालुक्यातील मनोज सीताराम वड (१४ वर्षे इयत्ता ९ वी, रा.दापटी तर देविदास परशुराम नावले (१५ वर्षे इयत्ता १० वी) रा.बिबळपाडा (दापटी) अशी या गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांची नावे असुन ते एकाच गाव पाड्यातील रहिवासी आहेत. या विद्यार्थ्यांच्या आत्महत्याचे कारण अस्पष्ट असले तरीही काही दिवसांवर आलेल्या परीक्षेचे मुलांना ताण आहे की, अजून काही आत्महत्येचे कारण आहे, हे निश्चित कळू शकलेले नाही. गेल्या १५ वर्षातील ही तिसरी घटना असून यापूर्वी एका शिक्षक आणि विद्यार्थी यांनी देखील आत्महत्या केल्याची माहिती आहे. दरम्यान, नुकताच या घटनेबाबत वाडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूचा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलिसांनी सुरू केला असुन या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे. वाडा तालुक्यातील आंबिस्ते खुर्द येथील अनुदानित असलेली पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय उन्नती मंडळ, भिवंडी अंतर्गत आंबिस्ते माध्यमिक आश्रमशाळा व वसतिगृह आहे. या शाळेत पालघर- ठाणे जिल्ह्यातील विविध दुर्गम भागातील जवळपास ५२० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

मोखाडा तालुक्यातील हे दोन्ही आदिवासी विद्यार्थी देखील या आश्रमशाळेतच लहानपणापासून (इयत्ता पहिली) शिक्षण घेत होते. त्यांची अभ्यासात प्रगती ठीक होती. अशी माहिती मुख्याध्यापक दत्तात्रेय दाते यांनी दिली. बुधवारी रात्रीचे ७:३० वाजताचे नियमित जेवण झाल्यानंतर सर्व विद्यार्थी वसतिगृहात झोपी गेले असताना मनोज वड आणि देविदास नावले या दोघांनीही शाळेच्या पाठीमागे व वसतिगृहाच्या समोरील असलेल्या एका झाडाला नायलॉनच्या दोरीने गळफास घेतलेले असल्याचे रात्री १:३० वाजण्याच्या सुमारास उमेश पाटील या सुरक्षा रक्षकाच्या निदर्शनास आले. त्यांनी या घटनेची तत्काळ माहिती शाळेतील मुख्याध्यापक दत्तात्रेय दाते व व्यवस्थापक अधिक्षक राजू सावकारे यांना दिली. त्यानुसार शाळा प्रशासनाने गावातील सरपंच व पोलीस पाटील तसेच वाडा पोलीस आणि मयत विद्यार्थ्यांच्या पालकांना माहिती देवून कळविले. घटनेची माहिती मिळताच सरपंच, पोलीस पाटील व स्थानिक वाडा पोलीस उपनिरीक्षक राजकुमार मुंढे, पोलीस नाईक दिलेश भडांगे व अन्य पोलीस कर्मचारी हे रात्री २:१५ वाजण्याच्या सुमारास घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मृतदेहांना पहाटे ५:३० वाजता शवविच्छेदनासाठी वाडा ग्रामीण रुग्णालयात आणले. या विद्यार्थ्यांच्या एकाकी मृत्यूबाबत पालकांना मोठा धक्का बसला असून पालकांनी आज सकाळी ११ वाजण्याचा सुमारास आश्रमशाळेत जाऊन घडलेल्या घटनेबाबत माहिती मिळविण्याचा प्रयत्न देखील सुरू केला आहे. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला आहे. विद्यार्थ्यांनी आत्महत्या करण्यापूर्वी कुठलीही सुसाईट नोट मिळून आली नाही. मात्र एका आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याच्या बॅगेत एक मोबाईल मिळून आला असून पोलिसांनी तो तपासा करिता ताब्यात घेतला आहे. मनोज सीताराम वड आणि देविदास परशुराम नावले या दोन्ही विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घडलेल्या घटनेमुळे या आश्रमशाळेतील विद्यार्थी सुरक्षित नसल्याचे पुन्हा एकदा दिसून आले आहे. या संस्थेच्या अनुदानित आश्रमशाळेत भोंगळ व अनागोंदी कारभार सुरू असुन विद्यार्थ्यांकडे पुरेसे लक्ष नसल्याची चर्चा सध्या जोरदार सुरू आहे. दरम्यान विद्यार्थ्यांच्या आत्महत्याचे कारण कळू शकले नाही. पोलिस तपास करीत आहेत, असे राजू सावकारे व्यवस्थापक अधिक्षक माध्यमिक आश्रमशाळा, आंबिस्ते खुर्द यांनी सांगितले.

# अर्नाळ्यातील गोवारी कुटुंबियांवर हल्ला करणारा आरोपी गजाआड!



**विरार : वार्ताहर**

विरार पश्चिमेच्या अर्नाळा येथे राहणाऱ्या येथे राहणाऱ्या एका कुटुंबावर सोमवारी पहाटे एका अज्ञात व्यक्तीने प्राणघातक हल्ला केला होता. या हल्ल्यात कुटुंबातील तीन सदस्य गंभीर जखमी झाले होते. या प्रकरणी गुरुवारी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखा कक्ष ३ कडून ही कारवाई करण्यात आली आहे. विरार पश्चिमेच्या अर्नाळा बंदरपाडा या गावात राहणाऱ्या गोवारी कुटुंबावर सोमवारी पहाटे तीनच्या सुमारास प्राणघातक हल्ला झाला होता. यात जगन्नाथ गोवारी (७६), लीला गोवारी (७२) आणि नेत्रा गोवारी (५२) गंभीररित्या जखमी झाले होते. या प्रकरणी अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता. याबाबत गुन्हे शाखा कक्ष ३ च्या पथकाकडून तपासाला सुरुवात करण्यात आली होती. याबाबत पोलिसांनी ५०० हुन अधिक सीसीटीव्हीच्या आधारे शोध घेतला तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीला मुंबई येथून अटक करण्यात आली आहे. दिपेश अशोक नाईक (२९) असे आरोपीचे नाव असून तो मुंबई येथे सुरक्षारक्षक म्हणून नोकरी करत होता. आरोपी हा अर्नाळ्याच्या बंदरपाडा येथील रहिवासी असून कर्जबाजारी झाल्याने चोरी करण्याच्या उद्देशाने त्याने गोवारी कुटुंबावर प्राणघातक हल्ला केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

नाईक याने काही व्यक्तींची आर्थिक फसवणूकही केली असून त्याच्यावर ४० ते ५० लाखांचे कर्ज होते माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपीला पुढील तपासासाठी अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस उपायुक्त (गुन्हे) संदीप डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ३ चे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास कांबळे, पोलीस उपनिरक्षक रामचंद्र पाटील आदींच्या पथकाने केली.

# ठाण्यात महिलेने आमदाराला अश्लिल व्हिडिओ पाठवले, दहा लाखांची मागणी, महिलेवर गुन्हा

**ठाणे : वार्ताहर**

व्हॉट्सॲपवरुन कॉल करत एका आमदाराला अश्लील छायाचित्रे आणि व्हिडीओ पाठवले. त्यानंतर या आमदाराकडे एका महिलेने काही लाख रुपयांची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या आमदाराच्या तक्रारीनंतर संबंधित महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी महिलेचा आता पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे. तक्रारदार आमदार ठाण्यात राहत असून गेल्या वर्षी ते कोल्हापूर दौऱ्यावर होते, त्यावेळी त्यांना एका महिलेचे सातत्याने फोन येत होते. परंतु, फसवणूक होण्याच्या शक्यतेमुळे आमदाराने या महिलेचा फोन ब्लॉक केला होता. परत त्यांना एका महिलेचे व्हॉट्सॲप कॉल आणि मेसेज येऊ लागले. या महिलेने त्यांना अश्लील फोटो आणि व्हिडीओ देखील पाठवले होते. गेल्या महिन्यात परत संबंधित महिलेने या आमदाराला संपर्क साधत, पाच




ते दहा लाख रुपयांची मागणी केली. या प्रकरणी या आमदाराने आपली प्रतिमा मलीन करण्याचा हेतुपुरस्पर प्रयत्न केल्याची तक्रार दाखल केली आहे. त्यानंतर, या महिलेच्या विरुद्ध ठाण्यातील चितळसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरीकडे, दादर येथे राहणाऱ्या ५७ वर्षीय महिलेची ऑनलाईन फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. दक्षिण मुंबईतील एका प्रसिद्ध महाविद्यालयात पीडित महिला ग्रंथपाल आहे. महाविद्यालयात असताना तिला मोबाइलवर गॅस बिल भरण्याबाबत एक संदेश आला होता. तिने मेसेजमधील क्रमांकावर संपर्क केला असता, समोरील व्यक्तीने तुमचं वीज बिल भरायचं बाकी असल्याचं सांगत गॅस कनेक्शन बंद होण्याची भीती घातली. त्यावर महिलेने बिल भरण्याची तयारी दाखवताच समोरील व्यक्तीने एक ॲप डाऊनलोड करण्यास सांगितलं. ॲप डाउनलोड करताच महिलेच्या मोबाईलचा ताबा घेत समोरील व्यक्तीने घेत १७ वेळा ऑनलाईन व्यवहार करुन दोन लाख ७० हजार रुपये काढल्याचा आरोप होत आहे. ओशिवरा येथील एका ज्येष्ठ महिलेबाबतही असेच घडले. तिने गॅस बिलाबाबत आलेल्या संदेशातील लिंकवर क्लिक केले. लिंकवर जाऊन अनेकदा प्रयत्न केला तरी बिल भरले जात नव्हते. त्यामुळे दुसऱ्या दिवशी महिलेने गॅस कंपनीच्या कार्यालयात जाऊन बिल भरले. मात्र त्यानंतर बँक खात्यामधील बॅलन्स तपासला असता एक लाख ७७ हजार रुपये परस्पर वळविण्यात आल्याचे लक्षात आले.

# ३६ तासांनंतर महावितरण कर्मचाऱ्यांचा संप अखेर मागे

**वसई : वार्ताहर**

राज्यसरकारकडून महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या कंपन्यांचे केले जाणारे खाजगीकरण आणि पुनर्रचनेविरोधात वीज कर्मचाऱ्यांकडून संप पुकारण्यात आला होता. शुक्रवारी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चर्चेनंतर कर्मचारी संघटनांनी संप मागे घेतला आहे. महाराष्ट्र सरकारच्या खाजगीकरण आणि पुनर्रचनेच्या निर्णयाविरोधात महाराष्ट्रभरात महावितरणच्या २३ पैकी ७ संघटनांनी संप पुकारला होता. ९ ते ११ ऑक्टोबर अशा ७२ तासांसाठी हा संप पुकारण्यात आला होता. वसई विरार शहरातील महावितरणच्या स्थायी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांनीही वसई पूर्वेतील महावितरण कार्यालयासमोर संप पुकारला होता. यात वसई विरार शहरात कार्यरत असणारे ६० ते ६५ टक्के कर्मचारी सहभागी झाले होते. महापारेषण आणि महानिर्मिती कंपन्यांमध्ये केली जाणारी कर्मचाऱ्यांची पुनर्रचना आणि महानिर्मितीच्या अंतर्गत येणारे जलविद्युत प्रकल्प, महापारेषणच्या अंतर्गत



येणाऱ्या टॅरिफ आधारित स्पर्धात्मक बोली (TBCB) खाजगीकरणाला विरोध, महावितरणच्या ३२९ उपकेंद्रांचे खाजगीकरण, समांतर वीज परवान्याला विरोध, राज्य सरकारने लागू केलेल्या पेन्शन योजना लागू करणे, रिक्त पदांची भरती अशा विविध मागण्या यावेळी कर्मचाऱ्यांकडून करण्यात आल्या होत्या. यासंबंधी महावितरण व्यवस्थापन आणि वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समिती शुक्रवारी बैठक पार पडली. वीज कर्मचाऱ्यांच्या मागण्यांशी सुसंगत भूमिका महावितरणच्या व्यवस्थापनाने घेतल्यामुळे महावितरण कर्मचारी संघटनांकडून दुसऱ्याच दिवशी संप मागे घेण्यात आला आहे. तसेच संपात सामील झालेले सर्व स्थायी आणि कंत्राटी कर्मचारी पुन्हा कामावर रुजू होत असल्याची माहिती देखील वसई वीजकामगार सर्कलचे सहसचिव सचिन निगुडकर यांनी दिली आहे.

द्विपक्षीय चर्चा करूनच निर्णय घेतला जाईल असे आश्वासन राज्य शासनाकडून देण्यात आले आहे. तसेच यासाठी १४ आणि १५ ऑक्टोबर रोजी बैठका देखील आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे संपात सामील झालेल्या सर्व संघटनांनी हा संप मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे, असे इंजिनिअर्स असोसिएशन वसई मंडळाचे सहसचिव दीपक डोंगरे यांनी सांगितले.

# पीक गावात सर्पमित्राने अजगराला शिताफीने पकडून जंगलात सोडला



**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील पीक गावात सोमवारी सकाळच्या सुमारास ग्रामस्थांना बसस्टॉप परिसरात एक भलामोठा साप फिरताना दिसल्याने एकच खळबळ उडाली. नागरिकांनी तात्काळ ग्रामस्थ परेश पाटील यांच्या माध्यमातून मलवाडा येथील सर्पमित्र विशाल पाटील यांच्याशी संपर्क साधला. सर्पमित्र विशाल पाटील हे काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी अत्यंत शिताफीने सापाला पकडले. तपासात हा सुमारे सात फूट लांबीचा अजगर जातीचा साप असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर वनविभागाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत अजगराला सुरक्षितपणे जंगलात सोडण्यात आले. गावात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या आकाराचा साप दिसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेनंतर ग्रामस्थांनी सर्पमित्र विशाल पाटील आणि वनविभागाचे आभार मानले. सर्पमित्रांनी नागरिकांना आवाहन केले की, अशा प्रकारे साप दिसल्यास घाबरून न जाता त्वरित स्थानिक सर्पमित्र अथवा वनविभागाशी संपर्क साधावा, ज्यामुळे सापालाही इजा न होता सुरक्षितपणे त्याला नैसर्गिक अधिवासात परत सोडता येते.

# पालघर जिल्ह्यात शायनिंग होप आणि 'शिक्षा की पोटली' उपक्रमांचा शुभारंभ




**पालघर : वार्ताहर**

पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते सुरक्षा, प्राणी कल्याण आणि शैक्षणिक प्रोत्साहन या उद्देशाने बी.जी.एम. फाऊंडेशनने आशागड ग्रामपंचायत कार्यालय, तालुका डहाणू येथे 'shining hope- Reflective Belt Project' आणि 'Shiksha Ki Potali – शालेय बॅग वितरण उपक्रम' या दोन अभिनव उपक्रमांचे शुभारंभ केले. पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या हस्ते हे उद्घाटन करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की ही अत्यंत कल्पक आणि गरजेची योजना असून रस्तेअपघातांपासून जीव वाचविण्यासाठी समाज, शासन आणि स्वयंसेवी संस्थांनी अशा उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे. कार्यक्रमाच्या प्रारंभावर बी.जी.एम. फाऊंडेशनचे आऊटरीच प्रमुख किशोर गजघाटे यांनी प्रास्ताविक केले आणि सांगितले की आजचा दिवस पालघर जिल्ह्यासाठी आणि फाऊंडेशनसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. रस्ते सुरक्षा, प्राण्यांविषयी सहानुभूती आणि शिक्षण ही समाजपरिवर्तनाची तीन प्रमुख साधने असून आज त्यांना स्पर्श करणारे दोन उपक्रम सुरू होत आहेत. शायनिंग होप उपक्रमाद्वारे ग्रामीण भागातील भटक्या व पाळीव जनावरांना जैवविघटनशील परावर्तक कॉलर बेल्ट लावले जातील, जे वाहनांच्या प्रकाशात चमकून चालकांना दूरून दिसतात, ज्यामुळे अपघात टाळता येतात. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात डहाणू, पालघर, तलासरी आणि वाडा तालुक्यांमध्ये एक हजार जनावरांना बेल्ट लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून यासाठी ग्रामपंचायत, गौसेवक, पशुवैद्य आणि स्थानिक स्वयंसेवकांचा सक्रिय सहभाग आहे. उद्घाटनात थेट प्रात्यक्षिक दाखवून शेतकऱ्यांना प्रतीकात्मकरीत्या १०० बेल्टचे वितरण करण्यात आले. याचवेळी शिक्षा की पोटली उपक्रमाचा शुभारंभ देखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमांतर्गत ग्रामीण आणि आदिवासी शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय बॅग व शैक्षणिक साहित्य वितरण करून त्यांना शिक्षणात सातत्य व प्रोत्साहन देण्यात येणार आहे. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.प्रकाश हसनाळकर यांनी यावेळी शायनिंग होप हा उपक्रम एक असे सुरक्षा कवच आहे, जे अपघातांपासून माणूस आणि प्राणी दोघांनाही सुरक्षित ठेवते, असे सांगितले. डहाणू गट विकास अधिकारी पल्लवी सस्ते यांनी प्रकल्पाच्या यशासाठी ग्रामपंचायत, पोलीस, शासकीय विभाग आणि स्वयंसेवकांचे सहकार्य अत्यावश्यक असल्याचे नमूद केले. किशोर गजघाटे यांनी याबाबत सांगितले की शिक्षण हे परिवर्तनाचे सर्वात मोठे साधन असून बी.जी. एम फाउंडेशन ही जबाबदारी समाजाप्रती निष्ठेने पार पाडत आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी अतुल पारस्कर, ॲडमिन निश्चल मेहता, डहाणू तालुका पशु संवर्धन अधिकारी संदेश सुकाळे, आशागड पशु संवर्धन अधिकारी रमेश दळवी, उपसरपंच दिल्पेश दौडा, ग्रामपंचायत अधिकारी राहुल पाटिल, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, गौसेवक आनंद मोहिते, रोशन शर्मा, विश्वजित सिंग व इतर गौसेवक तसेच जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी, शिक्षक पिंपळे आणि शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# महापालिका मॅरेथॉन रद्द नव्हे तर पुढे ढकलण्यात आली; पालिकेचा खुलासा



**विरार : वार्ताहर**

वसई-विरार शहर महापालिका मॅरेथॉन रद्द नव्हे तर सद्यस्थितीत पुढे ढकलण्यात आली असल्याचे महापालिका प्रशासनाने म्हटले आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका मॅरेथॉन दरवर्षी डिसेंबर महिन्यात आयोजित केली जाते. राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित असलेल्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्यात याव्यात, असे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. त्यानुसार वसई-विरार महापालिकेच्या संभाव्य निवडणूका विचारात घेता उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिकेची वॉर्ड रचना अंतिम करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत महापालिका प्रशासन व कर्मचारी निवडणूक कामकाजाच्या तयारीमध्ये आहेत. तसेच पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या संभाव्य निवडणूका लक्षात घेता त्यामध्ये सुद्धा महापालिकेचे कर्मचारी व अधिकारी वर्गसुध्दा व्यस्त होऊ शकतात. संभाव्य महापालिका निवडणूक कामकाज विचारात घेता, वसई-विरार शहर महापालिकेच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणारी वसई-विरार शहर महानगरपालिका मॅरेथॉन रद्द करण्यात आली नसून सद्यस्थितीत ती पुढे ढकलण्यात आले आहे. महापालिका निवडणूकीचा कार्यक्रम पार पाडल्यानंतर मॅरेथॉन व क्रीडा क्षेत्रातील जाणकारांचा सल्ला घेऊन मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल असेही म्हटले आहे.

# वसई-विरारमध्ये जिल्हास्तरीय आंतरशालेय क्रीडा स्पर्धा संपन्न

**विरार : वार्ताहर**

क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद पालघर द्वारा वसई विरार शहर महापालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध स्पर्धा सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक ०७/१०/२०२५ ते दिनांक ०९/१०/२०२५ पर्यंत शालेय १४ वर्षे, १६ वर्षे व १९ वर्षे मुले, मुली यांचे कबड्डी स्पर्धेचे आयोजन महानगरपालिकेतील खुला रंगमंच हॉल, छेडा नगर, पेट्रोल पंप जवळ, नालासोपारा पश्चिम येथे करण्यात आले होते. सदर कबड्डी स्पर्धा दिनांक ०९/१०/२०२५ रोजी यशस्वीरित्या पार पडली. सदर स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या संघाला गोल्ड मेडल, द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या संघाला सिल्वर मेडल व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या संघाला ब्राँझ मेडल देऊन गौरविण्यात आले. उपरोक्त कार्यक्रमात महानगरपालिका क्रीडा विभागातील माननीय उप आयुक्त अजित मुठे साहेब, महानगरपालिकेतील क्रीडा समन्वयक व कर्मचारी उपस्थित होते. तसेच शालेय क्रीडा समिती मधील प्रमुख, सभासद, सल्लागार शिक्षक उपस्थित होते. सदर स्पर्धा सर्वांचे सहकार्याने यशस्वीरित्या पार पडली.



13 TO 19 OCTOBER 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 10/11/2025 8:47 PM Page 1



# सरन्यायाधीशांवर बूटफेक प्रकरणाच्या निषेधार्थ आंबेडकरी संघटनांचे आंदोलन, संघावर बंदी घालण्याची तीव्र मागणी



ठाणे : वार्ताहर

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर राकेश तिवारी याने भर न्यायदान कक्षात बूट फेकून मारण्याचा प्रयत्न केला. तसेच, त्याने या कृत्याबद्दल पश्चातापही व्यक्त केला नाही. या निषेधार्थ ठाण्यातील सर्व आंबेडकरी संघटनांनी गुरुवारी कोर्टनाका येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर जोरदार निदर्शने केली. यावेळी आंबेडकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ठाणे नगर पोलीस ठाण्यामध्ये लेखी फिर्याद देऊन ट्रोसिटी आणि देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. तसेच सुरूवातीपासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने संविधानाला विरोध केला आहे. त्यांच्या शिकवणीमुळेच राकेश तिवारी या वकिलाने हे कृत्य केले आहे, असा आरोप करत संघावर बंदी घालण्याची मागणी देखील केली. सर्वोच्च न्यायालयात कामकाज सुरू असताना, सोमवारी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर राकेश तिवारी या वकिलाने बूट फेकण्याचा प्रयत्न केला होता. हा प्रकार म्हणजे संविधानावर हल्ला आहे. सुरूवातीपासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने संविधानाला विरोध केला आहे. त्यांच्या शिकवणीमुळेच राकेश तिवारी या वकिलाने हे कृत्य केले आहे, असा आरोप करीत आंबेडकरी चळवळीतील संविधानप्रेमी पक्ष संघटनांच्या कार्यकर्त्यांनी नानासाहेब इंदिसे यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निदर्शने केली. यावेळी कार्यकर्त्यांनी संघावर बंदी घालण्याची मागणी केली. संविधानप्रेमी नागरिकांनी तसेच वकिलांनी हातात निषेधाचे फलक घेऊन सरकार आणि संघाच्या विरोधात घोषणाबाजी केली. यादरम्यान, नानासाहेब इंदिसे म्हणाले की, सरन्यायाधीश म्हणजे, देशाच्या न्यायप्रक्रियेतील सर्वोच्च स्थान आहे. आज तेही सुरक्षित नसतील तर देशातील एकही नागरिक सुरक्षित नाहीत, हेच स्पष्ट होत आहे. हा बूट फेकण्याचा प्रयत्न फक्त न्यायव्यवस्थेवर नव्हता. तर ते बौद्ध समाजातून आलेले असल्यानेच राकेश किशोर याने हे कृत्य केले आहे, असा आरोप केला. भास्कर वाघमारे यांनी, सरन्यायाधीश भूषण गवई जेव्हा महाराष्ट्रात आले होते. तेव्हा राज्य शासनाने त्यांना प्रोटोकॉल दिला नव्हता. यावरून मागासवर्गीय माणूस सर्वोच्च ...पान ६ वर

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील भ्याड हल्ल्या विरोधात भिवंडीत युवक काँग्रेसची जोरदार निदर्शने!




भिवंडी : वार्ताहर

देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर सुप्रीम कोर्टाच्या परिसरात सुनावणी दरम्यान एका वकिलाने बूट भिरकावल्याचा धक्कादायक प्रकार सोमवारी घडला. या भ्याड हल्ल्याचा निषेध देशभरातून होत असतानाच भिवंडी शहर जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष राहुल पाटील यांच्या नेतृत्वाखाली साठे नगर येथे जोरदार निदर्शनांनी निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी न्यायमूर्ती भूषण गवई जिंदाबाद च्या जोरदार घोषणा देण्यात आल्या. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून या निंदनीय घटनेचा युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. तर ही घटना असंविधानिक असून यातील दोषी वकिलावर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी यावेळी युवक काँग्रेसचे अध्यक्ष राहुल पाटील यांनी लावून धरली आहे. याप्रसंगी युवक काँग्रेसचे कार्यकर्ते व साठे नगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भिवंडीतील डॉ.शैलेश म्हात्रे यांचा आयुष पुरस्काराने सन्मान



भिवंडी : वार्ताहर

भिवंडी तालुक्यातील खारबाव येथील प्रसिद्ध निसर्गोपचार तज्ञ डॉ.शैलेश प्रभाकर म्हात्रे यांना आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन व विस्तार केन्द्र राजकोट टीडीसी पीपीडीसी आग्रा या एमएसएमई मंत्रालय भारत सरकारशी संलग्न असलेल्या संस्थेच्या वतीने अतिशय प्रतिष्ठेचा आयुष महासन्मान पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात आले.

नवी मुंबई तेथे पार पडलेल्या भव्य कार्यक्रमात सिनेअभिनेत्री श्रेया बुगडे व आमदार श्वेताताई महाले यांच्या हस्ते म्हात्रे यांना हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी युनायटेड नेशन चाईल्ड वुमेनचे सल्लागार तथा भारत सरकारच्या स्वास्थ व परिवार कल्याण मंत्रालययाचे माजी सहाय्यक महानिर्देशक डॉ.मंगला कोहली, डॉ.प्रवीण जोशी, डॉ.प्रणव पंडया, डॉ. नितीनराजे पाटील, डॉ.बाबुराव कानडे, डॉ.दिशा चव्हाण, डॉ.प्रशांत सावंत, डॉ.रवी शिंदे, डॉ.रचित म्हात्रे, डॉ.जनार्धन यादव यांच्यासह देशभरातील शेकडो आयुष चिकित्सक व थेरपिस्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयुर्वेद, योग नेचरोपैथी, होमियोपैथी, युनानी, सिद्ध, एक्युपंचर, एक्युप्रेशर अशा विविध आयुष क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या चिकित्सकांना व थेरपिष्ट यांना हा पुरस्कार देण्यात येतो. डॉ.शैलेश म्हात्रे यांनी आपल्या श्री मेख आयुर्धामच्या माध्यमातून आयुर्वेदिक व नैसर्गिक पद्धतीने शेकडो रुग्णांचे आजार बरे केले असून त्यांच्या या कार्याची दखल आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनने घेत त्यांना आयुष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

# घनकचरा व्यवस्थापन आपण करू शकतो हा विश्वास हवा -रामदास कोकरे



पालघर : वार्ताहर

घनकचरा व्यवस्थापन हा विषय अवघड नाही, तर आपली मानसिकता अवघड आहे. आपण करू शकतो हा विश्वास असेल, तर कोणत्याही गावात वा शहरात घनकचरा व्यवस्थापन निश्चितपणे करता येईल. कचरा वेगळा ठेवणे आणि वेगळा देणे हा सर्वात सोपा आणि प्रभावी उपाय आहे. डोळ्यात गेलेल्या कणाप्रमाणे शहरातील सार्वजनिक कचरा जोपर्यंत आपल्याला खुपत नाही, तोपर्यंत घनकचऱ्याची समस्या सुटणार नाही, असे प्रतिपादन कल्याण-डोंबिवली महापालिकेचे उपायुक्त रामदास कोकरे यांनी केले. जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागामार्फत जिल्ह्यातील मोठ्या ग्रामपंचायती, नगरपंचायती व पालिकांसाठी घनकचरा व्यवस्थापनावरील कार्यशाळेचे आयोजन जननायक बिरसा मुंडा सभागृह, जिल्हा परिषद पालघर येथे करण्यात आले होते. या कार्यशाळेत घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले उपायुक्त रामदास कोकरे यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. घरातच कचऱ्याचे वर्गीकरण करणे,कचरा रस्त्यावर न फेकणे आणि प्लास्टिकचा वापर न करणे असे तीन मंत्र शून्य कचरा निर्मितीसाठी कोकरे यांनी यावेळी दिले. आपल्या अनुभवातून बोलताना त्यांनी माथेरान, वेंगुर्ला आणि संगमनेर येथे राबविलेल्या यशस्वी उपक्रमांचा उल्लेख केला. वेंगुर्ल्यातील देशातील पहिला प्लास्टिकचा रस्ता, शंभर टक्के मातीच्या गणेशमूर्ती, पिशव्या बंदीबाबतची जनजागृती, तसेच शाळांमधून राबविलेले विद्यार्थी उपक्रम यांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. अशा प्रकारचे उपक्रम पालघर जिल्ह्यातही यशस्वीपणे राबविता येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रशिक्षणाद्वारे घनकचरा व्यवस्थापनाच्या शाश्वत पद्धती, पुनर्वापर, वर्गीकरण आणि स्थानिक स्तरावरील उपाययोजना याबाबत सखोल मार्गदर्शन देण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) अशोक पाटील, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अतुल पारसकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, घनकचरा व्यवस्थापनासाठी थातूरमातूर उपाययोजना न करता शाश्वत आणि टिकाऊ उपाय राबविणे अत्यावश्यक आहे. या दृष्टीनेच रामदास कोकरे यांचे मार्गदर्शन जिल्ह्यासाठी उपयुक्त ठरेल, असे ते म्हणाले. यावेळी खानिवली गावचे सरपंच भरत हजारे यांनी देखील आपल्या अनुभवातून त्यांच्या गावामध्ये राबवत असलेल्या उपक्रमांविषयी सविस्तर माहिती उपस्थित त्यांना दिली. पाणी व स्वच्छता चे माहिती शिक्षण व संवाद सल्लागार आत्माराम विशे यांनी जिल्ह्यात सुरू असलेल्या स्वच्छता ही सेवा उपक्रमाबद्दल माहिती दिली. या कार्यशाळेला जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, नगरपरिषद तसेच पालिकांचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सर्वोच्च न्यायालयातील घटनेचा लातूर जिल्हा वकील मंडळाकडून निषेध




लातूर : वार्ताहर

दिल्ली येथील सर्वोच्च न्यायालयात भारताचे सरन्यायाधीश भूषण आर. गवई यांच्यावर न्यायदान कक्षेमध्ये झालेल्या हल्ल्याच्या घटनेचा निषेध म्हणून, बुधवार, दि. ८ ऑक्टोबर २०२५ लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने मूक मोर्चा काढण्यात आला. दर मोर्चा सकाळी ११.३० वाजता लातूर न्यायालय परिसरातून निघून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संपन्न झाला. या मोर्चामध्ये सर्व वकील बांधवांनी एकजुटीने सहभाग नोंदविला. लाल फिती लावून वकील बांधवांनी शांततेत आपला निषेध नोंदविला. या मोर्चाच्या माध्यमातून, सर्वोच्च न्यायालयासारख्या पवित्र न्यायसंस्थेतील अशा प्रकारच्या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला असून, न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा व सुरक्षितता अबाधित ठेवण्याची मागणी करण्यात आली. मोर्चा शांततेत व शिस्तबद्ध रीतीने पार पडला. दि.०७ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत या घटनेचा निषेध करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता, आज दिवसभर वकील बांधवांनी लाल फित लावून कामकाज केले. या मोर्चामध्ये लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. योगेश डी जगताप, महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड.आण्णाराव पाटील, लातूर जिल्हा वकील मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. संजय जगदाळे, महिला उपाध्यक्ष ॲड. मनीषा दिवे पाटील, सचिव ॲड. गणेश गोजमगुंडे, ग्रंथालय सचिव ॲड. प्रणव रायपूरकर, सहसचिव ॲड. निलेश मुचाटे, महिला सहसचिव ॲड. अभिलाषा गवारे, कोषाध्यक्ष गणेश कांबळे तसेच ॲड. उदय गवारे, ॲड. गंगाधर कोदळे, ॲड. लहू सुरवसे, ॲड. राजकुमार गंडले, ॲड. शिवकुमार बनसोडे, ॲड. गोविंद शिरसाट, ॲड. नागनाथ बद्दे, ॲड. एम डी ठाकूर, ॲड. उगीले, ॲड. सुनंदा मोटे इंगळे, ॲड. इरफान शेख, ॲड. हनुमंत वैजाळे, ॲड. सोमेश्र्वर बिराजदार, ॲड. कोमल राठोड, ॲड. दौलत दाताळ, ॲड.निखिल काळगे, ॲड. शिल्पा शहादाद पुरी, ॲड. अनिल चुणगुणे, ॲड. नितीन राठोड, ॲड. दीपक माने व लातूर जिल्हा वकील मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# वाडा येथे श्रमजीवी संघटनेच्या महिला ठिणगीकडून ठिय्या आंदोलन




वाडा : वार्ताहर

वाडा तालुक्यातील महिलांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत श्रमजीवी संघटनेच्या महिला ठिणगी शाखेच्या वतीने बुधवारी (दि. ८ ऑक्टो.) तहसील कार्यालयासमोर भव्य ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. महिला ठिणगीच्या नेत्या व पदाधिकाऱ्यांनी शासन व प्रशासनाचे लक्ष महिलांच्या तसेच आदिवासी भागातील गंभीर समस्यांकडे वेधले.

मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे: निराधार महिलांना ग्रामपंचायत स्तरावरच योजनांचा लाभ देण्यात यावा. गर्भवती महिलांना अंगणवाडीतून अमृत आहार नियमित उपलब्ध व्हावा. उपकेंद्रांमधील डॉक्टर व परिचारिका निवासी राहून सेवा द्याव्यात. जलजीवन मिशन योजना अपूर्ण असल्याने महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागते; तात्काळ पूर्णत्वास न्यावी. रोजगार हमी योजनेअंतर्गत बेरोजगारांना तातडीने कामे उपलब्ध करून द्यावीत. आदिवासी गाव-पाड्यांमध्ये अद्याप रस्ते नसल्याने नागरिकांना आरोग्य व शिक्षणाच्या अडचणी भेडसावत आहेत; रस्ते तात्काळ मंजूर करावेत.विजेअभावी अंधारात असलेल्या वाड्या-पाड्यांना वीज पुरवठा सुरू करावा, तसेच स्थलांतरित कुटुंबांचे विजमीटर परत बसवून जोडण्या द्याव्यात. आश्रमशाळांमधील अस्वच्छता, शिक्षकांचे गैरहजेरी, मारहाण व सुरक्षेअभावी विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे तातडीने लक्ष देऊन संबंधितांवर कारवाई करावी. महिला सक्षमीकरणासाठी २०१५ पासून प्रलंबित निधी महिला बचत गटांना वितरित करावा. गावठाण प्रस्ताव फॉरेस्ट विभागाकडे प्रलंबित असून ते तात्काळ मंजूर करावेत. स्वामित्व योजनेअंतर्गत वंचित कुटुंबांना सनद वाटप करावे. घरपट्टी नसलेल्या कुटुंबांना घरपट्टी देण्यात यावी. या आंदोलनाद्वारे महिला ठिणगी संघटनेने प्रशासनाला मागण्यांवर तात्काळ निर्णय घेण्याचे आवाहन केले. तसेच तहसीलदार, विविध विभाग प्रमुख आणि स्थानिक प्रशासनाला मोर्चाच्या ठिकाणी उपस्थित राहून समस्या ऐकण्याचे आवाहन करण्यात आले.

# वाडा नगरपंचायतीच्या वाढीव करवाढी विरोधात महाविकास आघाडीचे आंदोलन




वाडा : वार्ताहर

नगरपंचायतीमार्फत करण्यात आलेल्या वाढीव कर आकारणीविरोधात महाविकास आघाडीतर्फे शुक्रवारी वाडा नगरपंचायत कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. नगरपंचायतीकडून निवासी व व्यवसायिक मालमत्ताधारकांना वाढीव करवाढीच्या नोटिसा बजावण्यात आल्या असून या अन्यायकारक कर आकारणीचा पुनर्विचार व्हावा यासाठी महाविकास आघाडीकडून यापूर्वीच २६ सप्टेंबर रोजी निवेदन देण्यात आले होते. तसेच २ ऑक्टोबरपर्यंत निर्णय घेण्याची मागणी केली होती. मात्र कोणतीही कार्यवाही न झाल्याने निषेध म्हणून करवाढीच्या नोटीसींची जाहीर होळी करून आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात आघाडीचे पदाधिकारी, नागरिक व व्यापाऱ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. आंदोलनादरम्यान अन्यायकारक करवाढ रद्द करा अशा घोषणा देत नागरिकांनी संताप व्यक्त केला.

# मूल्यसंस्कार, गर्भसंस्कार, शिशु संस्कार, युवा प्रबोधन व पालकत्व कार्यशाळा संपन्न



वसई : वार्ताहर

संस्कार, संस्कृती व चारित्र्य निर्माण ही सक्षम राष्ट्र निर्मितीचा आधारभूत पाया आहे. परम पूज्य गुरूमाऊलींच्या आशिर्वादाने ह्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेला २१० सेवेकरी प्रतिनिधी सहभागी झाले होते. श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे प्रशिक्षण प्रतिनिधी प्रकाशजी गोडे, सौ. येवले ताई, सौ. माने ताई व सौ. गीता ताई कासार यांनी गर्भसंस्कार, शिशुसंस्कार, मूल्यसंस्कार, युवा प्रबोधन, पालकत्व, अध्यात्म व विज्ञान या विषयांवर अत्यंत मौलिक मार्गदर्शन लाभले. पालघर जिल्हा शहर व ग्रामीण प्रतिनिधी तसेच तालुका प्रतिनिधी तसेच माजी जिल्हा प्रतिनिधी उपस्थित होते. नायगाव केंद्र, वसई केंद्र, निळेगाव नालासोपारा केंद्र, ...पान ६ वर

# दीपक मच्याडो यांच्या कथासंग्रहास 'साहित्यवलय' राज्यस्तरीय पुरस्कार




वसई : वार्ताहर

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना आणि धृपद एन्टरटेनमेन्ट यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या साहित्यवलय पुरस्कार २०२५ अंतर्गत दीपक मच्याडो यांच्या 'सारंगीचे सूर' ह्या कथासंग्रहास पदार्पण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. गडकरी रंगायतन, ठाणे येथे १० ऑक्टोबर २०२५ रोजी पद्मश्री पद्मजा फेणाणी-जोगळेकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यात पद्मजा फेणाणी यांच्या संगीत आविष्काराची झलक तसेच त्यांच्याशी संवाद साधण्यात आला. स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या ३५० पुस्तकांतून १८ साहित्यिकांना मूळ पुरस्कार तसेच लक्षवेधी पुरस्कार अशा गटांत निवडण्यात आलेले असून मूळ पुरस्कार विजेत्यांस रोख रु. ५५५५/, स्मृतिचिन्ह आणि मानपत्रानी सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रसिद्ध लेखक श्रीकांत बोजेवार यांना प्रबोधनकार ठाकरे जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. दीपक मच्याडो यांचा हा पहिलाच कथासंग्रह असून हा त्याला मिळालेला दुसरा राज्यस्तरीय पुरस्कार आहे. ...पान ६ वर